दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -१८ बुधवार, दि.२४ सप्टेंबर २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-18 Wednesday, Dt.24 September 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# पीक नुकसानीसाठी २,२१५ कोटींची मदत मंजूर:राज्यातील ३२ लाख शेतकऱ्यांना दिलासा

## पैसे ८-१० दिवसांत बँक खात्यात जमा होणार

मुंबई /प्रतिनिधी

मराठवाडा आणि विदर्भात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीच्या पाहणीनंतर आता राज्य सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. राज्य सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांसाठी पीक नुकसानभरपाई जाहीर केली आहे. खरीप २०२५ मधील पिकांच्या नुकसानीसाठी २२१५ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. मदत आणि पुनर्वसन विभागाने याबाबतचा शासन निर्णय आजच जाहीर केला असून, ही रक्कम आजपासूनच वितरीत केली जाणार आहे.

गेल्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यामध्ये मराठवाड्यासह विदर्भातील शेतकरी सर्वाधिक बाधित झाले होते. सरकारने केलेल्या पंचनाम्यानुसार, एकूण ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सरकारने तातडीने पाऊल उचलले आहे.

जून ते ागस्टमधील नुकसानीसाठी असणार मदत

पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. अशा परिस्थितीत त्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. जाहीर झालेली मदत आजच वितरित केली जाणार असून, यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीची भरपाई मिळण्यास मदत होईल. मराठवाड्यासह राज्यातील ज्या-ज्या भागात अतिवृष्टी झाली आहे, त्या सर्व भागांतील शेतकऱ्यांचा या



### शेतकऱ्यांना पैसे मिळण्यासाठी दहा ते बारा दिवसांचा कालावधी

राज्य सरकारच्या वतीने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी २ हजार २१५ कोटींची मदत आतापर्यंत रिलीज करण्यात आली आहे. मात्र हे सर्व पैसे एकाच जीआरने नाही तर वेगवेगळ्या प्रकारच्या जीआरच्या माध्यमातून देण्यात येत आहे. तसेच ही प्रक्रिया अद्याप थांबलेली नाही. आत्तापर्यंत २,२१५ कोटी रुपयांची मदत आम्ही केली आहे. त्यातले १,८२९ कोटी रुपये पोहोचले आहेत. वाटप झाल्यानंतर देखील शेतकऱ्यांना पूर्ण पैसे मिळण्यासाठी दहा ते बारा दिवसांचा कालावधी लागेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

मदतीमध्ये समावेश करण्यात आला आहे. जून २०२५ ते ागस्ट २०२५ या कालावधीत अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे झाले होते. त्याकरिता ही मदत असणार आहे.

कोणत्या विभागात किती मदत?

दरम्यान, जुलै महिन्यापासून छत्रपती संभाजीनगरमध्ये ७२१ कोटी, नाशिकमध्ये १३.७७ कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. ऑगस्टमध्ये पुणे विभागासाठी १४.२९, नागपूर विभागाला २३.८५ कोटी आणि अमरावती विभागाला ५६५.६० कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. तर कोकणाला १०.५३ कोटी रुपये देण्याचे निर्देश देण्यात आले होते. ही सगळी मिळून राज्य सरकारने खरीप हंगामासाठी आतापर्यंत २२०० कोटी रुपये देण्याचे निर्देश दिले असल्याचे मंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले होते.

# गोदावरीला आलेल्या पुराचा पोहनेरला वेढा; धनंजय मुंडेंनी होडीतून जात ग्रामस्थांना दिला धीर



सर्व यंत्रणा सज्ज; कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी तयार राहण्याच्या प्रशासनास सूचना

परळी /प्रतिनिधी

गोदावरी नदी प्रवाहास प्रचंड पूर आलेला असून, परळी तालुक्यातील पोहनेर गावास पुराचा वेढा पडला आहे, याठिकाणी आज परळीचे आमदार तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी चक्क होडीतून (चप्पू) जात गावातील नागरिकांशी संवाद साधत त्यांना धीर व दिलासा दिला.


धनंजय मुंडे यांनी या संपूर्ण भागातील गावांच्या स्थितीचा प्रशासनाकडून आढावा घेत प्रशासनास कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी व सर्व प्रकारच्या यांत्रणांसह सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. दरम्यान अनेक घरांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळित होऊन संसारोपयोगी साहित्य, अन्न धान्य आदींचे नुकसान झाले असून, स्थानिक आपत्ती

(उर्वरीत पान २ वर)

# आ.संदीप क्षीरसागर पुन्हा नागरिकांच्या मदतीला धावले; अनेक ठिकाणी नुकसानीची केली पाहणी

## प्रशासकीय विभागाला तातडीने उपाय योजना करण्याचे दिले निर्देश

बीड (प्रतिनिधी) बीड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पावसाने नुकसान झाले असून आ.संदीप क्षीरसागर पुन्हा एकदा नागरिकांच्या मदतीला धावून गेले. मंगळवार (दि.२३) रोजी त्यांनी मतदारसंघातील अनेक ठिकाणी जाऊन नुकसानीची पाहणी केली. (उर्वरीत पान २ वर)





### आ.क्षीरसागरांकडूनजलमय झालेल्या धांडे नगर परिसरात पाहणी

आ. संदीप क्षीरसागर हे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या ग्रामीण भागासह शहरात देखील अनेक भागात पाहणी करत आहेत. नुकसान झालेल्या ठिकाणी जाऊन संकटात सापडलेल्या नागरिकांना शासनाच्या वतीने मदत करत आहे. बीड शहरातील बार्शी रोडवरील कै. शिवाजी धांडे नगर परिसरात पावसाचे पाणी साचल्यामुळे हा परिसर जलमय झाला आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी धांडे नगर भागात जाऊन नागरिकांशी आणि महिलांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी स्थानिक नागरिकांसोबत संपूर्ण परिसरात जाऊन पाहणी केली.पाहणी दरम्यान त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना वाढलेली पाणीपातळी कमी करण्यासाठी तात्काळ उपाय योजना करण्यास सांगितले.

# खा.बजरंग सोनवणे पुरग्रस्तांच्या भेटीला; मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचा शब्द

बीड: बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. मंगळवारी पहाटे जिल्ह्यातील ५७ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असून खा.बजरंग सोनवणे मागील आठ दिवसांपुर्वी झालेल्या अतिवृष्टीची पाहणी करून दिल्लीला गेले होते. यानंतर मागे पुन्हा अतिवृष्टी झाल्याने ते तातडीने मंगळवारी सकाळी बीडला रवाना झाले. यानंतर दुपारी त्यांनी धानोरा, देवळा (ता.अंबाजोगाई) आणि इस्थळ (ता.केज) येथे अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली.

बीड जिल्ह्यात दि.१४ सप्टेंबरपासून अतिवृष्टी होत आहे. पहिल्यांदा अतिवृष्टी झाली तेव्हा तातडीने

(उर्वरीत पान २ वर)



शेतकऱ्यांचे पुसले आश्रू, केज, अंबाजोगाई तालुक्यात दिल्या भेटी

## ऑगस्ट मधील नुकसानीसाठी बीड जिल्ह्यास ५६ कोटी ७३ लाखांची मदत

परळी (प्रतिनिधी) - ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीची मदत म्हणून राज्य सरकारने आज १३३९ कोटी रुपयांची मदत वितरीत करण्याचा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या मार्फत निर्गमित केला असून, बीड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीच्या मदतीपोटी ५६ कोटी ७३ लाख रुपये मदत मंजूर करण्यात आली आहे.

**एकट्या परळी तालुक्यास ३० कोटी**

दरम्यान ऑगस्ट महिन्यात बीड जिल्ह्यात परळी तालुक्यात सर्वाधिक १०४ गावांमध्ये पिकांचे ३३% पेक्षा अधिक नुकसान झाले होते. त्यामुळे सुमारे ५४,८९० बाधित शेतकऱ्यांना जिल्ह्यात सर्वाधिक ३० कोटी १६ लाख रुपये मदत एकट्या परळी तालुक्यासाठी मंजूर करण्यात आली असल्याची माहिती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी सोशल मीडिया पोस्ट व्दारे सांगितली आहे. ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी संपूर्ण स्थानिक प्रशासन व सर्व गट - गण प्रमुख यांची एकत्रित बैठक घेऊन गावनिहाय नुकसानीचा आढावा घेऊन त्यानुसार पंचनम्याचे अहवाल शासनास सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार सादर अहवालानुसार ही मदत मंजूर करण्यात आली आहे.

## खामगाव, नांदूर, हिरापूर, शेतकऱ्यांशी यशराज पंडितांनी भेट घेऊन साधला संवाद



**मुसळधार पावसाने पिकांचे मोठे नुकसान**

गेवराई ( प्रतिनिधी ) गेल्या आठ दिवसापासून होत असलेल्या जोरदार मुसळधार पावसाने गेवराई तालुक्याला झोडपले असून, शेकडो एकर जमिनीवरील पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. सिंदफणा नदीला मोठा पूर आला असल्याने या भागातील अनेक गावच्या शेतकऱ्यांची नुकसान झाले आहे. युवा नेते यशराज पंडित यांनी खामगाव नांदूर हिरापूर पिंपळगाव कानडा आधी गावांमध्ये भेटी देऊन पूर परिस्थितीची पाहणी केली यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी बोलताना

(उर्वरीत पान २ वर)

# गायरान धारकांच्या नावे जमिनी करण्यासाठी राज्यभर लढा उभा करणार-पप्पू कागदे

## गायरान धारकांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन

बीड/प्रतिनिधी

राज्यासह जिल्हाभरात कसत असलेल्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी व कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने आज दि.२३ सप्टेंबर २०२५ मंगळवार रोजी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर युवा रिपाइं



प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास अभिवादन करुन भव्य रॅली काढून, जिल्हाधिकारी कार्यालयावर महाधरणे आंदोलनास सुरुवात करण्यात आली.

केंद्रिय मंत्री रामदास आठवले दलित पँथरच्या माध्यमातून कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी राज्यभर गायरान धारकांचा लढा उभा केला. राज्याचे समाज कल्याण मंत्री असतांना १४ एप्रिल १९९० ला शासन परिपत्रक (शासन जी.आर.) लागू केला. त्यामुळे लाखो हेक्टर गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करुन त्यांना उपजीविका भागविण्याचे साधन निर्माण करुन दिले.गायरान जमिनी नावे

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# कोठारी आयोगाची भूमिका: समाजवास्तवाचे भान

कोठारी आयोगाचा दिर्घ अहवाल दोन भागात विभागता येतो. पहिल्या भागात १९६४ चे भारताचे समाजवास्तव व शिक्षण स्थिती आणि दुसऱ्या भागात शिक्षणाची सैध्दांतिक भूमिका स्पष्ट केली आहे. २ ऑक्टोबर १९६४ला आयोगाने आपल्या कामाची सुरुवात केली. १२ कार्यगट तयार करून १०० दिवस केंद्रशासित व राज्यशासित क्षेत्राचा अभ्यास समितीने केला. प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, शेती शिक्षण, प्रौढ शिक्षण, विज्ञान शिक्षण आणि संशोधन, शिक्षक प्रशिक्षण आणि स्तर, विद्यार्थी कल्याण, नविन तंत्र व पध्दती, लोकशक्ती, प्रशासकिय शिक्षण विभाग, आर्थिक तरतुद या १२ गटांमध्ये अभ्यास करण्यात आला. या १२ गटांमध्ये पुढील विषयावर अभ्यास केंद्रित करण्यात आला होता. स्त्री शिक्षण, मागासवर्गीयांचे शिक्षण, शाळा इमारती, (भौतिक सुविधा) शाळेचे सामाजिक संबंध, आकडेवारी, (सांख्यिकी) पुर्व प्राथमिक शिक्षण आणि शालेय पाठ्यक्रम या विषयाचा अभ्यास आयोगाने केला. भारतातील ९००० लोक, विविध सामाजिक घटक व संघटना, शाळा, महाविद्यालये, उद्योग क्षेत्र, राष्ट्रीय आंतर्राष्ट्रीय शिक्षण अभ्यासक, स्त्रिया, विद्यार्थी शिक्षक, विविध क्षेत्रातील अभ्यासक अशा विविध घटकांशी आयोगाने चर्चा केली. व्यापक व महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास कोठारी आयोगाने केला.

आयोगाच्या अभ्यासाची व्याप्ती आणि दिशा लक्षात घेण्यासारखी आहे. शिक्षण ही सामाजिक, भौतिक, राजकीय कृती असते. समाजवास्तव लक्षात घेऊनच त्यात भरीव बदल होऊ शकतात याचे भान आयोगाला होते, हे त्यांच्या अभ्यासाच्या विषयातून स्पष्ट होते. या अभ्यासाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे केवळ वास्तव अधोरेखित केले नाही, तर ते सोडवण्याची भूमिका घेतली. भारताचे वास्तव त्यांनी पुढीलप्रमाणे अधोरेखित केले. अन्न–धान्याचा तुटवडा, आर्थिक व बेरोजगारीचे प्रश्न, सामाजिक आणि राष्ट्रीय एकता आणि राजकिय चेतना हे मूख्य आव्हान त्यांनी अधोरेखित केले. या सर्व प्रश्नांचा संबंध शिक्षणाशी जोडला व क्रांतिकारी शिक्षण व्यवस्थेची गरज प्रतिपादली.

खाद्यान्य निर्भरतेसाठी शेती शिक्षण: १९६४ची भारताची लोकसंख्या व जन्मदर लक्षात घेता अन्न–धान्याचे उत्पादन पुरेसे होत नव्हते. अन्न–धान्याची गरज भागवण्याचा विषय राजकिय व आर्थिक मानला जातो. हे काही अंशी सत्य आहे. परंतु शिक्षण व्यवस्था त्याकडे दुर्लक्ष करु शकत नाही. कोठारी आयागाने हा विषय शिक्षणाशी जोडला. प्रचलित शिक्षण व्यवस्थेचा शेती शिक्षणाचा व शिक्षितांचा दृष्टिकोन पुढील शब्दात व्यक्त केला. इस शिक्षा व्यवस्था में कृषि की सर्वाधिक महत्ता प्रतिबिंबित नही होती जिसकी उपेक्षा सभी अवस्थाओं पर की जाती है जिसकी ओर देश की चोटी की प्रतिभाओं का समुचित अंश आकृष्ट नही होता; विश्वविद्यालयों के कृषि संकायो में भरती होणे वालों की संख्या बहुत ही कम है तथा कृषि कॉलेज तुलनात्मक दृष्टि से कमजोर तथा अल्प विकसित है भारताच्या आर्थिक विकासासाठी शेती उत्पादनात वाढ व शेतीचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे, याकडे आयोगाने लक्ष वेधले. त्यावेळच्या शिक्षण व्यवस्थेचे शेती ज्ञानाकडे दुर्लक्ष व शिक्षितांच्या अनास्थतेतून सामाजिक वास्तव प्रतिबिंबित केले. औपचारिक शिक्षणात उत्पादक ज्ञानाचा अंतर्भाव सोईचा व गरजेपुरता मर्यादित ठेवला गेला. तो मुख्य ज्ञान प्रवाहाचा भाग बनला नाही.



# मंठा तालुका ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी - सरपंच अविनाश राठोड

मंठा /प्रतिनिधी

तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गावांमध्ये भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाच्या तडाख्याने तलाव, बंधारे व नदीचे पात्र फुटून शेतजमिनी वाहून गेल्या असून शेतीचे नदीसारखे स्वरूप झाले आहे. या अतिवृष्टीत कपाशी, उडीद, सोयाबीन, तुर यांसारखी सर्व पिके उद्ध्वस्त झाली असून शेतकरी पूर्णतः हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर मा. सरपंच अविनाश नाईक राठोड यांनी तहसील कार्यालयामार्फत शासनाकडे निवेदन सादर केले. यात संपूर्ण मंठा तालुका ओला दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ४० ते ५० हजार रुपयांची तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर सरपंच महादेव सूर्यवंशी, उपसरपंच नामदेव फुपाटे, गौतम दाहींजे, जगदीश राठोड, कैलास चव्हाण, अविनाश चव्हाण, कृष्णा राठोड, श्रीहरी मगर, गजानन चव्हाण, गजानन फुपाटे, पंकज दवणे, गोविंद सानप, देविदास राठोड, संदीप देशमुख, विशाल चव्हाण, गणेश अंभोरे, कृष्णा नवले यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.दसरा–दिवाळी तोंडावर आली असताना शेतकरी हवालदिल झाला आहे. आता सरकारकडूनच आधार मिळेल या आशेवर आम्ही आहोत – पीडित शेतकरी

# आरोग्यदूतचे संपादक बाबा देशमाने यांना पितृशोक

माजलगाव /प्रतिनिधी

पत्रकार बाबा देशमाने यांचे वडील शेतीनिष्ठ शेतकरी श्रीहरी संतोबा देशमाने,वय ७० यांचे अल्पशा आजाराने मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ६ वाजता राहत्या घरी निधन झाले.त्यांचा पार्थिवावर शोकाकुल वातावरणात चाटगाव, ता.धारुर,जि.बीड येथे सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

महाराष्ट्राचे विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे एकनिष्ठ तथा मुख्यमंत्री आरोग्य सहायता कक्षाचे तत्कालीन प्रमुख मंगेश चिवटे सर यांचे अत्यंत विश्वासू आरोग्यदूत या मासिकाचे संपादक ज्येष्ठ पत्रकार बाबा देशमाने यांचे वडील श्रीहरी देशमाने हे शेतीनिष्ठ शेतकरी होते.

**श्रीहरी संतोबा देशमाने यांचे अल्पशा आजाराने निधन**



काही महिन्यापूर्वीच त्यांच्या पत्नीचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले होते. या दुःखातून देशमाने परिवार सावरत नाही तोच घरातील कुटुंबकर्ते श्रीहरी देशमाने यांचे अल्पशा आजाराने राहत्या घरी पहाटे ६ वाजता दुःखद निधन झाले. या निधनाने देशमाने कुटुंबियासह चाटगाव परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.मोठ्या शोकाकुल वातावरणामध्ये त्यांच्या पार्थिवावर चाटगाव येथे सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. देशमाने कुटुंबीयावर कोसळलेल्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई परिवार सहभागी आहे.

# ढोकसाळ येथे 'स्वस्थ नारी – सशक्त परिवार' अभियानांतर्गत आरोग्य शिबिर

मंठा /प्रतिनिधी

महाराष्ट्रभर १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या 'स्वस्थ नारी – सशक्त परिवार' अभियानांतर्गत ढोकसाळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात महिलांसाठी वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात महिलांची रक्तदाब, मधुमेह, कर्करोग तपासणी, गर्भवतींची प्रसूतीपूर्व तपासणी व लसीकरण करण्यात आले. तसेच महिलांचे समुपदेशन व किशोरवयीन मुलींना मासिक पाळीतील स्वच्छता आणि आरोग्य शिक्षण देण्यात आले.

हे शिबिर जिल्हा आरोग्य



अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. रघुवीर चंदेल, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगन्नाथ कुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप हजारे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले.

आरोग्य सहाय्यक व आशा स्वयंसेविकांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वी झाले. ग्रामीण भागातील महिलांना आरोग्य तपासणीसह आरोग्यविषयक जनजागृती मिळाल्याने अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




**हिंगोली – पुर्णा सहकारी साखर कारखान्याची ४७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा हसतखेळत संपन्न.**



**शिरूर कासार – ब्रम्हनाथ येळंब हद्दीतील वणवेवस्ती येथे अंदाजे ५० ते ६० नागरिक व ३०–४० शेळ्या पुरामध्ये अडकल्याने संपर्क तुटला होता. सर्व नागरिकांना बिट अंमलदार पोह तुषार गायकवाड व बिट मदतनीस सुनील बहिरवाल यांनी सुरक्षित स्थळी स्थलांतरित करून खाकी वर्दीतील माणुसकीचे दर्शन घडवले आहे.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–५१९ दि.२२.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान कृष्णा नाना बरडे, रा.धनगर पिंपरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जयश्री कृष्णा बरडे | मुलगी | ०१.०४.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २२/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–४९२ दि.२२.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान बाबासाहेब नाथा भिसे, रा.पारनेर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **बहिण**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जिजाबाई रामेश्वर गोल्टे | बहिण | ०४.०६.२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २२/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७८३ / २०२५**
**किशोर भारतराव मैड वि. निरंक**
**(मार्फत –ॲड. एस. पी. येवले, गेवराई)**

ज्याअर्थी मयत भारत पि. नागोराव मैड, रा. बेद्रे गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड हे / हया दिनांक ११/११/२०२४ रोजी मौजे बेद्रे गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ किशोर पि. भारतराव मैड, वय ४६ वर्षे, धंदा शेती रा. बेद्रे गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ आनंद पि. भारतराव मैड, वय ४९ वर्षे, धंदा शेती रा. बेद्रे गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ३ मनोज पि. भारतराव मैड, वय ४६ वर्षे, धंदा शेती रा. बेद्रे गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. ४ भीवरा भ्र. भारतराव मैड, वय ५५ वर्षे, धंदा शेती रा. बेद्रे गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यानी या न्यायालयाकडे केला आहे

त्यापेक्षा सदर अर्जदार व गैरअर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत भारत पि. नागोराव मैड, रा. बेद्रे गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २०/०९/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख:– ३०/१०/२०२५

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७८६ / २०२५**
**नजमोद्दीन आजमुद्दीन काझी वि. निरंक**
**(मार्फत ॲड. आर. एम. खरात, गेवराई)**

ज्याअर्थी मयत संजिदा आजमोद्दीन काझी रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड हे / हया दिनांक १०/०३/२००३ रोजी मौजे धोंडराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ नजमोद्दीन आजमुद्दीन काझी, वय ४८ वर्षे, धंदा शेती रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड अर्जदार क. २ मजामोद्दीन आजमुद्दीन काझी, वय ४७ वर्षे, धंदा – शेती रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. ३ रिजवान प्र. सय्यद खाय्यामोद्दीन, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम रा. धनगर वाडा, पैठण जि. औरंगाबाद यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार व गैरअर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार याना सदर मयत संजिदा आजमोद्दीन काझी रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २२/०९/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख:– २९/१०/२०२५

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

पान १ वरून...

**गोदावरीला आलेल्या..**

निवारण निधीतून तातडीने आर्थिक मदत करण्याच्या सूचना श्री मुंडे यांनी महसूल प्रशासनास केल्या आहेत.

पोहनेर सहित आजूबाजूच्या बऱ्याच गावांना पाण्याचा वेढा पडलेला असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देत काळजी घेण्याचे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे. कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तात्काळ प्रशासनाशी किंवा आपल्या कार्यालयाशी संपर्क साधावा असेही आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

दरम्यान राज्य सरकार या भीषण परिस्थिती मध्ये शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील व १००% नुकसानीची भरपाई दिली जाईल, अशी अपेक्षा देखील धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे. यावेळी ड गोविंदराव फड, राजाभाऊ पौळ, लक्ष्मणराव पौळ, प्रभाकर पौळ, विशाल श्रीरंग पाटील, चंद्रकांत कराड, माऊली तात्या गडदे, बाबासाहेब काळे, नितीन निर्मळ, राम किरवले यांसह ग्रामस्थ तसेच तहसीलदार व्यंकटेश मुंडे, सिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ दहिफळे यांसह महसूल, आपत्ती व्यवस्थापन, पोलीस आदी विभागाचे अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते.

**खामगाव, नांदूर, हिरापूर, ...**

यशराज पंडित म्हणाली की, पूर परिस्थितीने पिकांचे आणि घराचे मोठे नुकसान झाले आहे. परंतु शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. बदामराव पंडित यांचे कुटुंब कायम आपल्या सोबत आहे. सरकारकडून नुकसानग्रस्तांना मदत मिळवून देण्यासाठी आम्ही पूर्ण ताकतीने प्रयत्न करू. झालेले नुकसान भरून निघणार नाही. परंतु नव्या उमेदीने आपण उभा राहू असा धीरही त्यांनी शेतकऱ्यांना दिला आहे.

**खा.बजरंग सोनवण....**

खा.बजरंग सोनवणे यांनी बांधावर जावून पिकाची पाहणी केली होती. यानंतर काही दिवसाने पाऊस थांबला होता. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे हे दिल्ली येथे जिल्ह्याच्या विकास कामाच्या निमीत्ताने गेले होते. यानंतर बीड जिल्ह्यात पावसाने सुरूवात केली. सलग तीन दिवसांपूसन बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झालेली आहे. यामुळे नद्याना महापूर आलेला आहे. या पुरात शेती आणि पिकेही वाहून गेली आहेत. अनेक शेतकऱ्यांचे पशुधनही वाहून गेले असून कोट्यावधी रूपयांचे नुकसान झालेले आहे. मागील काही दिवसांपासून शेतात पाणी असल्याने पिके पिवळी पडत आहेत. शिवाय पुरामुळे शेती खरडून गेली असून आता पुन्हा शेतकऱ्यांनी शेती करायची कशी असा प्रश्न आहे. मंगळवारी खा.बजरंग सोनवणे हे दिल्लीवरून शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी परतले. यानंतर त्यांनी केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील विविध गावांना भेटी

पान १ वरून...

दिल्या. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकरी, आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. कोणतीही अडचण वाटली तर संपर्क करा, तुम्हाला शासनस्तरावर मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू, वेळप्रसंगी शासनाला भांडू परंतु मदत मिळवून देऊ, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.

आज पाटोदा, शिरूर बीड दौरा

खा.बजरंग सोनवणे हे आज पाटोदा, शिरूर आणि बीड तालुक्यातून वाहणाऱ्या मोठ्या नद्यामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करणार आहेत. पाटोदा, शिरूर शहरात पाणी शिरूर त्याठिकाणी व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान झाले होते. त्याठिकाणी देखील ते भेटी देणार आहेत. तर बीड तालुक्यात सिंदफणामुळे जिथे नुकसान झाले आहेत, अशा ठिकाणी शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

**आ.संदीप क्षीरसागर पुन्हा....**

मागील काही दिवसांपासून बीड जिल्ह्यासह तालुक्यात देखील अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी आणि नागरिक संकटात सापडले आहेत. अशा नागरिकांना संकटातून बाहेर काढण्यासाठी बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर हे सातत्याने अतिवृष्टी झालेल्या ठिकाणी जाऊन पाहणी करता आहेत. शेतकऱ्यांना, नागरिकांना मदत करताना पाहावयास मिळत आहेत. शासनाच्या वतीने मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत.शासन दरबारी पत्र व्यवहार करून तातडीने उपाय योजना करण्याची मागणी करत आहेत. मंगळवार (दि.२३) रोजी देखील आ. संदीप क्षीरसागर नुकसानीची पाहणी करायला पोहचले. बीड मतदारसंघातील लिंबा–रूई येथे अतिवृष्टीमुळे पुलाला मोठे भगदाड पडल्यामुळे मुर्शदपूर, लिंबा–रूई, रुई–लिंबा, तांदळवाडी भिल्ल, रुद्रपुर, केतूरा या गावांचा संपर्क तुटला आहे. बीड तालुक्यातील पारगाव सिरस गावाला भेट देऊन अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची बांधावर जाऊन पाहणी केली. उमरद जहांगीर येथील नदीवरील पूल अतिवृष्टीने वाहून गेला आहे. याठिकाणी देखील आ.संदीप क्षीरसागर यांनी गावकऱ्यांची भेट घेतली व त्यांच्याशी संवाद साधून प्रशासकीय विभागाला योग्य कार्यवाहीच्या सुचना दिल्या.

**गायरान धारकांच्या..**

करण्यासाठी गायरान धारकांनी मुळ कागद पत्रांसह आपले प्रस्ताव वेळो–वेळी महसूल विभागाकडे सादर केलेली आहेत. परंतू शासनाच्या गळचेपी धोरणांमुळे गायरान जमिनी नावे होण्यासाठी विलंब होत आहे. अठरापगड जातीच्या समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी काम करणारी चळवळ रिपब्लिकन पक्षाची आहे. आम्ही रिपाइंच्या माध्यमातून आजपर्यंत

पान १ वरून...

जिल्ह्यातील गायरान धारकांच्या नावे दोन हजार एकर जमीन करून सातबारा वाटप केले आहेत, व पाच हजार एकर गायरान जमिनीवर नविन अतिक्रमण करण्यात आले आहे. हे रिपाइंच्या आंदोलनाचे मोठे यश आहे. कसत असलेल्या गायरान जमीन व नवीन अतिक्रमणित जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी १९९० च्या शासन जीआर नुसार गायरान धारकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. भूमिहीन गायरान धारक, शेतमजूर, ऊसतोड कामगार यांना प्रति महिना ३००० रुपये मानधन देण्यात यावे. गायरान धारकांच्या ७/१२ व ८–अ उतारा क्षेत्रावर असणारे पोट खराब क्षेत्र काढण्यात यावे.१९९० च्या शासन परिपत्रकास २०१५ पर्यंत मुद्दत वाढ देण्यात यावी. या प्रमुख मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर महाधरणे आंदोलन करण्यात आले. आगामी काळातही गायरान धारकांना हक्काच्या जमिनी मिळवून देण्यासाठी रिपाइंच्या वतीने राज्यभर गायरान धारकांचा लढा उभा करणार आहे.

यावेळी राजू जोगदंड, मझर खान, किसन तांगडे, किशोर कांडेकर,सुशिलाताई मोराळे, अशोक साळवे दिपक कांबळे, महादेव उजगरे, थोडीराम सिरसट, सचिन कागदे, हरिश मस्के मायाताई मिसळे, राणी गायकवाड, सलमा पठाण, शोभा गलांडे, दशरथ सोनवणे, सादेक पठाण,गोवर्धन वाघमारे, बापू पवार, शाहु डोळस, अरुण निकाळजे, लक्ष्मण सिरसट,

दशरथ शिदे, महेश आठवले, सादेक कुरेशी, विजय चांदणे, दिलिप बन्सोडे, रविंद्र जोगदंड, गौतम बचुटे, विलास वाघमारे, प्रमोद दासूद, दिपक कांबळे, मिलींद तरकसे, सुरज काळे, निलेश ढोबळे, राहुल सरवदे, भगवान ससाणे, गणेश लांडगे, राहुल वाघमारे,राजकुमार सोनवणे, विजय डावरे, हरीश जावळे, कपिल जावळे, किशोर जावळे, विजय जाधव, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, नागेश दुबळे,भैय्या मस्के, संभाजी गायकवाड, भैय्या साळवे, संजय हनवते, सचिन वडमारे,पप्पू वाघमारे, सुभाष तांगडे, सतिष सिनगारे, राजाभाऊ वक्ते, शाम वीर , अक्षय कोकाटे, धम्मा पारवेकर, नामदेव वाघमारे, देवानंद वाघमारे अशोक दळवी, भैय्यासाहेब साळवे, भाऊसाहेब दळवी, दिलीप खंदारे, सुभाष पारवे, रामदास मस्के, मनोज बोराडे, महेंद्र वडमारे, बाळासाहेब गव्हाणे, भाउसाहेब कांबळे, भास्कर जावळे, सोनू वडमारे, जितेंद्र खरात, मोहन वक्ते, यांच्यासह हजारो गायरान धारक, महीला, व रिपाइं कार्यकर्ते महाधरणे आंदोलनात सामील झाले होते.

राज्यासह जिल्हाभरात कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपाइंचे शिष्टमंडळ येत्या १५ दिवसात राज्याचे मुख्यमंत्री व महसूलमंत्री यांना भेटणार आहे.

# प्रत्येकाच्या आयुष्यात हॅपिनेस निर्माण करणाऱ्या उपक्रमास बीडकरांची उत्स्फूर्त दाद

## निखळ मनोरंजनातून जगप्रसिद्ध समूहतज्ज्ञ नवनाथ गायकवाड यांनी दिला अनमोल संदेश

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना जिल्हा शाखा बीडच्या वतीने मिशन हॅपिनेसअंतर्गत जगप्रसिद्ध समूह तज्ञ नवनाथ गायकवाड यांचा सर्व स्तरातील मानवाच्या जीवनातील ताणतणाव घालून सुखी आणि समृद्ध जीवन जगण्यासाठी प्रेरणा देणारा व तीन तास निखळ मनोरंजनातून मानवी जीवनातील अनेक समस्या वरती निखळ मनोरंजनातून उपाय करून आनंदी जीवनाचा मार्ग दाखवणारा कार्यक्रम दिनांक २१ सप्टेंबर रविवारी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडला. यास बीडकरांनी उत्स्फूर्त दाद दिली.



याप्रसंगी शिक्षक दिन, अभियंतादिन व मराठवाडा मुक्ती संग्राम दिन या पवित्र दिनाचे औचित्य साधून बीड येथे आपली बहुमोल सेवा दिलेले इंजिनीयर एन. व्ही. बंडे यांची अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ धाराशिव या पदावर पदोन्नती झाल्यामुळे व इंजिनीयर सदगर यांची जीवन प्राधिकरण या विभागामध्ये कार्यकारी अभियंता पदावरती निवड झाल्यामुळे अभियंता दिनाचे औचित्य संघटनेच्या माध्यमातून भव्य सत्कार करण्यात आला. बीड शहराच्या वैभव मध्ये भर घालण्यासाठी आणि बीड शहरातील नागरिकांचे जीवन आनंदी करण्यासाठीआपापल्या परीने सामाजिक बांधिलकीचे जाण आणि भान ठेवून कार्यरत असणाऱ्या जाणीव ग्रुपचे अध्यक्ष अँड. विवेकानंदजी सानप व ज्ञानयोग ग्रुपचे इंजिनिअर वाघ यांचा देखील भव्य सत्कार करण्यात आला.

बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.प्रमुख पाहुणे म्हणून एन व्ही बंडे अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ धाराशिव, तोंडे साहेब कार्यकारी अभियंता सांबा विभाग बीड, डॉ. राजेंद्र भोरे, अँड.विवेकानंद सानप व इंजिनीयर वाघ हे कार्यक्रमास उपस्थित होते.डॉ. राजेंद्र भोरे यांनी या कार्यक्रमांमध्ये नागरिकांना आरोग्य जीवन कसे जगाव व त्यामुळे काय काळजी घेतली पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचय प्रास्ताविकामध्ये जिल्हा शाखा बीडचे अध्यक्ष इंजि.जे.एन.भोरे यांनी बीड जिल्ह्यातील नागरिकांसाठी संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या मिशन हॅपिनेसबद्दल माहिती दिली.

बीड शहरातील सर्व नागरिकांना व सेवानिवृत्त अधिकारी पदाधिकारी यांना स्वच्छ बीड सुंदर बीड या अभियानामध्ये सहभागी होऊन बीड शहरास सांस्कृतिक, शैक्षणिक , अध्यात्मिक क्षेत्रात पुणे शहरापेक्षाही पुढे घेऊन जाण्यासाठी सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. या मिशन हैप्पीनेस एक भाग म्हणून श्री नवनाथ गायकवाड यांचा अंतर्मनाची सुसंवाद हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटनेचे कार्याध्यक्ष श्रीगौतम चोपडे , संघटनेचे सचिव इंजिनिअर कांचन गायकवाड , प्रसार प्रमुख तुकाराम पवार , संघटनेचे उपाध्यक्ष अभियंता श्री एन.बी.चौरे संघटनेचे इंजि.शिवाजी बांगर, संघटनेचे राज्य कार्यकारणी सदस्य इंजि. प्रकाश करपे , संघटनेचे मार्गदर्शक डी. जी. तांदळे सर , प्रल्हाद जावळे, महिला पदाधिकारी श्रीमती सुनंदा कुलकर्णी, श्रीमती विजया सानप, बाळासाहेब खेडकर,आष्टी तालुका आंबेजोगाई तालुका अध्यक्ष श्री खंदारे, सचिव श्री बुरांडे केज तालुका अध्यक्ष श्री बोराडे, आष्टी तालुका अध्यक्ष इंजिनीयर तळेकर त्याचप्रमाणे जिल्हा तालुका संघटनेतील सर्व पदाधिकारी यांनी बीड जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रामध्ये प्रथमच राबवण्यात येणाऱ्या मिशन हॅपिनेसअंतर्गत आयोजित केलेल्या वरील कार्यक्रम अतिशय परिश्रम घेऊन यशस्वी केलेला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिशय बहारदार पद्धतीने केले व आपल्या सूत्रसंचालनामध्ये त्यांनी संघटनेची ध्येय धोरणे समोरील प्रेक्षकापर्यंत मोठ्या खुबीने पोहोचवली. कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या मान्यवरांचे आणि मिशन हैप्पीनेस मध्ये सहभागी झालेल्या बीड जिल्ह्यातील सर्वच नागरिकांचे आभार प्रदर्शन श्रीमती कुलकर्णी यांनी मानले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली ती पुन्हा तीन महिन्यांनी याच सभागृहामध्ये आनंदाचा महोत्सव साजरा करण्याचा निर्धाराने.



# धनगर समाज आरक्षणासाठी सुरू असलेल्या उपोषणाला खा. डॉ.कल्याण काळे यांचा जाहीर पाठिंबा

जालना /प्रतिनिधी

धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी जालना येथे १७ सप्टेंबर २०२५ पासून सुरू असलेल्या उपोषणाला आज सहावा दिवस झाला आहे.या उपोषणाला समाजातील तरुणाईसह ज्येष्ठ नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळत असून आंदोलन अधिक तीव्र होत आहे.

या उपोषण स्थळी जालना जिल्ह्याचे खासदार मा.डॉ. कल्याणराव काळे यांनी भेट देऊन उपोषणकर्त्यांची तब्येतीची विचारपूस केली.यावेळी त्यांनी धनगर समाजाच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे.समाजाच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही असे स्पष्ट शब्दांत मत व्यक्त केले.

खासदार कल्याण काळे यांच्या उपस्थितीमुळे उपोषणकर्त्यांना मानसिक बळ मिळाले असून समाजात या आंदोलनाबाबत नवा उत्साह दिसून येत आहे.

या वेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, कल्याणजी दळे, जे. प्रकाश चव्हाण,बबलू चौधरी,अजय बनकर, त्रिंबक पाबळे, कृष्णा पडूळ,लक्ष्मण मसलेकर,श्रीरंग कामटे,राम शिरसाठ,सोपान तिरुके,ज्ञानेश्वर इंगोले,विष्णू पाटील शेजुळ आदी पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेले हे आंदोलन गांभीर्याने घेऊन शासनाने तात्काळ सकारात्मक भूमिका घ्यावी अशी सर्वानुमते मागणी या वेळी करण्यात आली.

# सतीश घाटगे पाटील धावले पूरग्रस्त कुटुंबांच्या मदतीला

किराणा किट वाटपासाठी घेतला पुढाकार, पंचनाम्यासाठी प्रशासनाशी पाठपुरावा

शहागड /प्रतिनिधी

तालुक्यातील पिठोरी सिरसगाव गावात गल्हाटी नदीला आलेल्या पुरामुळे अनेक कुटुंबांवर मोठे संकट कोसळले आहे.रविवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे नदीला आलेल्या पुराचे पाणी थेट घरात शिरले. घरातील संसारोपयोगी वस्तू, धान्य,कपडे यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, अनेक कुटुंब उघड्यावर आले आहेत. अशा बिकट परिस्थितीत समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे पाटील हे गावात धावून आले आणि पूरग्रस्तांना दिलासा देण्यासाठी पुढाकार घेतला.

सोमवारी सकाळी घाटगे पाटील यांनी गावाला भेट देऊन थेट पूरग्रस्त कुटुंबांची घरोघरी जाऊन पाहणी केली.त्यांनी पूरग्रस्तांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.यावेळी त्यांनी तहसीलदार विजय चव्हाण यांच्याशी संपर्क साधत नुकसानीचे पंचनामे तातडीने करून सरकारी मदत मिळवून द्यावी अशा स्पष्ट सूचना दिल्या.

पूरग्रस्त कुटुंबांना तातडीच्या गरजा भागविण्यासाठी सतीश घाटगे यांनी किराणा किट वाटपाचा उपक्रम राबवला. या किटमध्ये जीवनावश्यक वस्तू, धान्य व इतर दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा समावेश आहे. त्यामुळे पूरग्रस्त कुटुंबांना तात्पुरता दिलासा मिळाला.पूरामुळे अन्न व निवाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असतानाच घाटगे पाटील यांच्या या तत्पर पुढाकारामुळे गावकऱ्यांना मानसिक व आर्थिक आधार मिळाला आहे. सरकारकडून मदत मिळेपर्यंत आम्ही तुमच्या सोबत आहोत असे आश्वासन त्यांनी



ग्रामस्थांना दिले.या भेटीवेळी समृद्धी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी, माजी सरपंच रामेश्वर माने,प्रेमानंद उढाण,राजेंद्र छल्लारे,शांतीलाल खारतुडे,बंडू मुंढे,बाळासाहेब नाझरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# आ.डॉ.हिकमत उढाण यांच्या विजयासाठी केलेला नवस फेडण्यास राहुल कनके यांचा तुळजापूरकडे पायी प्रवास

तिर्थपुरी /गजानन मुळे

घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील एकलहेरा येथील युवा नेते आणि आ डॉ. हिकमत उढाण यांचे कट्टर समर्थक राहुल रामनाथ कनके यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत उढाण यांचा विजय व्हावा म्हणून तुळजाभवानी मातेला पायी जाण्याचा नवस केला होता. आ.डॉ.हिकमत उढाण यांच्या विजयानंतर राहुल कनके यांनी आपला हा नवस पूर्ण करण्यासाठी २२ सप्टेंबर रोजी सहकाऱ्यांसह एकलहेरा-तुळजापूर असा पायी प्रवास सुरू केला आहे.

कोणतेही वाहन,कोणतीही सोय न घेता ऊन,वारा,पाऊस




याची पर्वा न करता हा प्रवास सुरू झाला आहे.रविवारी सकाळी गावातून निघालेल्या या यात्रेत राहुल कनके यांच्यासोबत तरुण सहकाऱ्यांनीही सहभाग घेतला असून तुळजाभवानी मातेच्या चरणी नतमस्तक होण्याचा त्यांचा निर्धार खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरत आहे.अनेक कार्यकर्ते आपल्या नेत्यांच्या विजयासाठी नवस करतात पण तो प्रत्यक्षात उतरवण्याचं धाडस फारच क्वचित दिसतं.राहुल कनके यांनी मात्र आपल्या नेत्यावरच्या अढळ श्रद्धेचा प्रत्यय घडवत हा नवस प्रत्यक्षात उतरवला आहे. त्यांच्या या पायी यात्रेमुळे कार्यकर्ता-नेता नातं किती घट्ट असतं हे अधोरेखित झालं आहे.आमदार डॉ.हिकमत उढाण यांच्याबाबतची निस्सीम निष्ठा आणि प्रेम यामुळेच कनके यांच्या या पायी प्रवासाची चर्चा सध्या तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण जिल्हाभर रंगली आहे. उढाण यांच्या विजयात श्रद्धा आणि विश्वासाची ही अनोखी भेट असल्याने आमदार उढाण यांनाही याचा विशेष आनंद झाला आहे.भक्ती, श्रद्धा आणि प्रेरणा राजकारणात विजय मिळवण्यासाठी अनेक राजकीय डावपेच केले जातात परंतु श्रद्धेपोटी केलेला नवस पायी चालत फेडण्याचं हे उदाहरण दुर्मिळ आहे.राहुल कनके यांनी उचललेलं हे पाऊल केवळ त्यांच्या नेत्यावरची निष्ठा दाखवून देत नाही तर तरुणाईसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

# अंबड तहसीलवर शेतकऱ्यांचा धडक मोर्चा-सरकारला इशारा

## ओला दुष्काळ जाहीर करा अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरेल

अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसाठी अंबड तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढत सरकारला थेट इशारा दिला. ओला दुष्काळ जाहीर करा, सरसकट कर्जमाफी करा, अन्यथा तीव्र आंदोलन उभारू अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.मत्स्योदरी देवी मंदिरापासून निघालेल्या या मोर्चात शेतकऱ्यांनी अतिवृष्टीमुळे उध्वस्त झालेले सोयाबीन, कापूस, तूर व मोसंबी हातात घेऊन सहभाग नोंदवला. तहसील कार्यालयावर पोहोचताच शेतकऱ्यांनी ओला दुष्काळ जाहीर करा,शेतकरी एकजुटीचा विजय असो जय जवान-जय किसान अशा गगनभेदी घोषणांनी प्रशासन हलवून सोडले.यावेळी हातात



चाबूक घेऊन शेतकऱ्यांनी जमिनीवर फटकार देत सरकारला जागे होण्याचा इशारा दिला. तहसीलदार विजय चव्हाण यांनी शेतकऱ्यांच्या वतीने सादर केलेले निवेदन स्वीकारले.अंबड तालुक्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करावा कुठल्याही अटी-शर्तीशिवाय शेतकऱ्यांचे सर्व कर्ज सरसकट माफ करावे विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी तात्काळ माफ करावी खरीप २०१८ च्या प्रलंबित पीक विम्याची रक्कम तात्काळ द्यावी एनडीआरएफच्या नियमांनुसार नाही तर प्रतिहेक्टरी ५०,००० भरपाई द्यावी पीक विमा पाहणी ऑफलाइन करावी व विमा कंपनीचे कायमस्वरूपी कार्यालय सुरू करावे,जनावरांच्या चाऱ्यासाठी तात्काळ आर्थिक मदत द्यावी,यावेळी एका संतप्त शेतकऱ्याने सरकारला थेट इशारा देत म्हटले की सरकारने फक्त घोषणाबाजी केली मदत मात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नाही. आमच्या मागण्या तातडीने मान्य झाल्या नाहीत, तर शेतकरी रस्त्यावर उतरले बिकट परिस्थिती निर्माण होईल. मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाल्याने त्यांचा रोष, संताप आणि संघर्ष स्पष्टपणे जाणवत होता. आता या शेतकऱ्यांच्या ज्वलंत मागण्यांवर सरकार नेमकी कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दोन गाई, एक वासरूची अवैध वाहतूक करणारा टाटा पकडला

## गोंदी पोलिसांची धडक कारवाई; एकाला अटक साडेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त

शहागड /प्रतिनिधी

अवैध जनावरांची वाहतूक रोखण्यासाठी गोंदी पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन गाई आणि एक वासरू असा साडेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी एका आरोपीस अटक करून न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. शहागड - साष्टपिंपळगाव रोडवर गस्त घालत असताना सचिन साळवे व त्यांच्या सहकाऱ्यांनी संशयित टाटा एस गाडी क्र. चक-२१-इक-१७०३ अडवली. तपासात गाडीमध्ये शहारुख जब्बार शेख वय-२८, रा.भाबेरी हा चालक असून त्याच्याकडे दोन गाई व एक वासरू दाटीवाटीने, क्षमतेपेक्षा अधिक भरून नेल्याचे उघड झाले.गाडीमध्ये जनावरांना हालचालीसाठी जागा नव्हती,ना चारा-पाण्याची व्यवस्था,ना औषधोपचाराची सुविधा. ही जनावरे कत्तलीसाठी नेली जात होती,असा प्राथमिक तपासानंतर निष्कर्ष काढण्यात आला. यामुळे आरोपीवर प्राण्यांवर छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० मधील कलम ११ (१) (अ), ११ (१) (फ), ११ (१) (ह), ११ (१) (ळ), ११ (१) (के), प्राण्यांचे परिवहन अधिनियम १९७८ चे कलम ४७, ५४, ५६ तसेच महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ११, ५अ, ५ब, ६, ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई गोंदी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रकरणी सहायक फौजदार ज्ञानेश्वर कटुंले हे पुढील तपास करीत आहेत.

# कर्मयोगी अंकुशरावजी टोपे साहेब जयंती सप्ताहानिमित्त तालुकास्तरीय योगासन स्पर्धेचे थाटात उद्घाटन

जालना /प्रतिनिधी

अंकुशराव टोपे महाविद्यालय,जालना येथे कर्मयोगी अंकुशरावजी टोपे साहेब यांच्या ८३ व्या जयंती सप्ताहानिमित्त तालुकास्तरीय योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.या भव्य स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दादासाहेब गजहंस यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शिक्षण महर्षी कर्मयोगी अंकुशरावजी टोपे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.संजय पाटील,प्रा.पांडुरंग खोजे,क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भुजंग डावकर,पर्यवेक्षक प्रा.रामप्रसाद



भालेकर,डॉ.पंडित रानमाळ, डॉ.सीमा निकाळजे,डॉ. रामदास वैद्य,डॉ.संतोष करवंदे, डॉ.शंकर तिकांडे, क्रीडा शिक्षक प्रा.चंद्रकांत लाटेकर,प्रा.डी.जे. शिंदे,प्रा.गुंजाळ,प्रा.गडदे,प्रा. मगरे तसेच तालुका क्रीडा संयोजक प्रा. शेख चांद आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत जालना तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.१४ वर्ष,१७ वर्ष आणि १९ वर्ष वयोगटातील मुला-मुलींनी उत्तम कामगिरी करण्यासाठी सहभाग घेतला.यावेळी प्राचार्य डॉ.दादासाहेब गजहंस यांनी मुलांना मार्गदर्शन करताना सांगितले की आज मुले मोबाईलवर वेळ वाया घालवतात,परंतु प्रत्येक मुलाने किमान एक तरी खेळ खेळणे गरजेचे आहे. मैदानी खेळांमुळे शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना मिळते. त्यामुळे मोबाईलवर खेळण्याऐवजी मैदानात जाऊन खेळा.असे आवाहन त्यांनी केले.स्पर्धेला यशस्वी करण्यासाठी पंच म्हणून सुलोचना पडघन, मीनाक्षी देशमुख,शिल्पा पारेख, शिल्पा शेलगावकर,निशांत चौधरी,शरद खोत आणि पाल सर यांनी सहकार्य केले.

# जमिनीवर कब्ज्यासाठी आईसह मुलीला जीवे मारण्याची धमकी

पोलीस अधीक्षकांकडे केली न्यायाची मागणी

बीड(प्रतिनिधी): पाटोदा तालुक्यातील काकडहिरा येथील प्रतिक्षा प्रशांत जायभाये आणि तिच्या आठ वर्षीय मुलीला त्यांच्या मालकी हक्काच्या जमिनीवर कब्जा मिळवण्यासाठी जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. प्रतिक्षा आणि मुलगी रिया यांनी पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देऊन आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माझ्या मालकी हक्क जमिनीमध्ये काम करत असताना तेथे अयोध्या अशोक जयभाये, अशोक अर्जुन जायभाये हे संबंधित नवरा-बायको तिथे आले व त्यांनी मला व माझ्या लहान मुलीला धमकवायला सुरुवात केली की आज पासून आम्ही या जमिनीचे मालक आहोत तर तू आज पासून या जमिनीमध्ये पाऊल टाकायचा नाही कारण गट क्रमांक ८ या मधील ३ एक्कर ७५ गुंठे जमिनीची खरेदी आम्ही तुझी सासू, पती आणि दोन नंदा यांच्या सहमतीने घेतलेली आहे. तुझा व तुझ्या मुलीचा या जमिनीवर कोणता हक्क नाही तरी या संदर्भात न्यायालयात प्रकरण चालू असताना देखील याची आम्हाला पूर्वकल्पना होती ही परंतू जमीन आम्हाला खूप स्वस्त दरात मिळत होती म्हणून आम्ही सर्वांनी संगणमातांनी ही खरेदी केलेली आहे. आता यापुढे तू व तुझ्या मुलीने या जमिनीवरती पाय ठेवायचा नाही.ठेवला तर तुला व तुझ्या मुलीला जीवे मारू अशी धमकी संबंधित आरोपींनि दिली.असून पीडित कुटूंब भीतीच्या वातावरणात त्रस्त आहे. याप्रकणी पोलीस अधीक्षकांनी लक्ष घालून संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करून मला व माझ्या मुलीला न्याय द्यावा अशी मागणी दिलेल्या निवेदनातून करण्यात आली असून मला न्याय मिळाला नाही तर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या समोर मी व माझी मुलगी आत्मदहन करणार असा ईशाराहि निवेदनात दिला आहे. .

# ना. पंकजाताई मुंडे यांनी पवारांकडून घेतली माहिती



## शेतकर्यांच्या आयुष्याची राखरांगोळी झालीय, विषय खूप गंभीर, तातडीने मदत करा - बाळराजे पवार

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई मतदारसंघात पडलेल्या मुसळधार पावसाने शेत पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेती खरडून गेली आहे. बांधलेल्या विहीरी खचल्या आहेत. त्याच बरोबर, नागरिकांच्या घरात पाणी गेल्याने अनेकांचे संसार उघडय़ावर आलेत. त्यामुळे, हे नुकसान भरून निघणारे नाही. शासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी बाळराजे पवार यांनी केली आहे.

दरम्यान, युवा नेते बाळराजे पवार यांनी मंगळवार ता. २३ रोजी सिंदफणा काठच्या गावांना भेटू देऊन नुकसान झालेल्या भागाची पाहाणी केली. राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्याशी व्हिडीओ कॉलवरून संवाद साधून, गेवराई मतदारसंघातल्या नुकसानीचे सविस्तर माहिती दिली. झालेल्या नुकसानी संदर्भात चर्चा करून, नुकसानग्रस्त भागाचा सविस्तर अहवाल द्या, अशी सूचना

ना. मुंडे यांनी पवार यांना केली आहे. सदरील संभाषण युवा नेते बाळासाहेब सानप यांच्या मोबाईलवर झाले.गेवराई तालुक्यातील विविध भागाला, रविवार व सोमवारी पून्हा मुसळधार पावसाने अक्षरश झोडपून काढले आहे. शहराच्या पश्चिम, उत्तर, दक्षिण भागातील गाव रहदारीचे रस्ते पाण्यात गेले आहेत. त्यामुळे, जन जीवन विस्कळीत झाले आहे. शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. सर्वाधिक फटका गोदावरी व सिंदफणा काठावर असलेल्या गावांना बसला असून, उभ्या पिंकाचे नुकसान झाले आहे. शेती पिकांसह खरडून गेली आहे. बांधलेल्या विहीरी ढासळून बुजून गेल्या आहेत. कापूस पिकाला फटका बसला आहे.मंगळवार ता. २३ रोजी बाळराजे पवार यांनी सिंदफणा गाठच्या गावांना भेटी देऊन, नुकसानग्रस्त भागाची पाहाणी करून; नागरीकांशी संवाद साधला. सिरसमार्ग, धारवंटा, उक्कडपिंप्री, साक्षाळपिंप्री गावातील शेतीचे प्रचंड नुकसान झालेले असल्याने, या भागातील शेतकर्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. सिंदफणा काठावरच्या गावांचे झालेले नुकसान पाहता असताना, युवा नेते बाळासाहेब सानप यांनी थेट पंकजाताई मुंडे यांच्याशी व्हिडीओ कॉलवर संपर्क केला. यावेळी , बाळराजे पवार यांनी ना. मुंडे यांच्याशी सविस्तर चर्चा करून, उद्भवलेल्या परिस्थितीची सविस्तर माहिती दिली. सिंदफणा आणि गोदाकाठच्या गावांच्या बाधित झालेल्या क्षेत्राचा सविस्तर अहवाल द्या, अशी सूचना ना. मुंडे यांनी बाळराजे पवार यांना केली आहे. दरम्यान, गेवराई मतदारसंघात पडलेल्या मुसळधार पावसाने शेत पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेती खरडून गेली आहे. बांधलेल्या विहीरी खचल्या आहेत. त्याच बरोबर, नागरिकांच्या घरात पाणी जाऊन, संसार उघडय़ावर आलेत. त्यामुळे, हे नुकसान भरून निघणारे नाही. शासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अशी मागणी आग्रहाची बाळराजे पवार यांनी केली आहे.यावेळी अनिल पौळ, बाळासाहेब सानप,पवन गावडे,रमेश तळेकर, सचिन वावरे,विष्णुपंत आतकरे, श्रीराम घाटुळ, पत्रकार जुनेद बागवान, सुभाष सुतार, आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

### नैसर्गिक आपत्तीमंत्री गिरीश महाजन पीडितांचे

# अश्रू पुसण्यासाठी पोहोचले थेट पूरग्रस्त नांदूर हवेलीत



बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने सिंदफणा नदीला पूर आला आहे. या नदीचे पाणी बऱ्याच भागांमध्ये घुसले असून, बीड तालूक्यातील नांदूर हवेली गावात देखील नदीचे पाणी घुसल्याने अनेक नागरिक पाण्यामध्ये अडकले होते. त्या पार्श्वभूमीवर जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन विभाग मंत्री गिरीश महाजन यांनी बीड तालूक्यातील नांदूर हवेली येथील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी पीडितांना दिलासा दिला.

मंत्री श्री. महाजन यांनी नागरिकांशी संवाद साधुन, त्यांना तात्काळ मदत मिळण्यासाठी आश्वासित केले. पंचनामे करण्याचे काम सुरु आहे, परंतू शासनामार्फत पूर्वग्रस्त भागातील बाधीत नागरिक आणि शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचविण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसिलदार चंद्रकांत शेळके, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह नांदूर हवेली येथील गावकऱ्यांची उपस्थिती होती.

# तलवाडा सर्कल मधील गोदाकाठी असलेले गावात पाणी जास्त प्रमाणात

## गेल्यानंतर काही गावांना स्थलांतरित करण्याचे प्रशासनाचे हालचाली सुरु

तलवाडा /प्रतिनिधी

सध्या बीड जिल्ह्यात नव्हे तर महाराष्ट्रभर पावसाने हंकार मांडला आहे काही ठिकाणी ढगफुटी तर काही ठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांचे अनुतिक नुकसान झाल्याचे चित्र पाहावेस मिळत आहे सर्व पीक पाण्यात तरंगताना दिसत आहे तोंडाघासही आलेला खास हिरवला आहे.



तलवाडा येथील मंडळात राजापूर, काठोडा, राहेरी येथील गावात गोदावरीचे पाणी गेल्यानंतर त्यांना स्थलांतरित करण्यासाठी प्रशासनाचे हालचाली सुरू असल्याचे मंडळ अधिकारी बाबा बडे यांनी सांगितले आहे. तर नागरिकांना सुरक्षित जागे ठेवण्यासाठी त्यांनी राजापूर, राहेरी, नागरीकासाठी तलवाडा येथील जिल्हा परिषद शाळेत व त्वारितापुरी महाविद्यालय शाळांना सूचना दिल्याचे सांगितले आहे. तसेच काठोडा गावातील नागरिकांसाठी काठोडा तांडा येथील जिल्हा परिषद शाळा त्यांच्या साठी व्यवस्था करण्यात आली आहे. राजापूर काठोडा,राहेरी, या गावांना तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर ,मंडळ अधिकारी बाबा बडे,यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली यावेळी सरपंच भास्कर गवते,गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

बीड /प्रतिनिधी

पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

बुधवार दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता शासकीय वाहनाने बीड जि. हिरापूरकडे प्रयाण. दुपारी ३.३० वाजता आगमन व मौजे हिरापूर जि. बीड येथे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी. सायंकाळी ४.०० वाजता शासकीय वाहनाने बीडकडे प्रयाण. सायंकाळी ४.४५ वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथे आगमन व राखीव.गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत बीड ग्रामीण (जि.बीड), शिरुर कासार,आष्टी आणि पाथर्डी जि. अहिल्यानगर या तालुक्यात अतिवृष्टी झालेल्या नुकसाणीची पाहणी दौरा. सोईनुसार शासकीय वाहनाने परळी वैद्यनाथ जि. बीडकडे प्रयाण.



# पूरग्रस्त भागात डॉ.योगेश आणि सारिका क्षीरसागर यांनी पाहणी करून पीडितांना दिला दिलासा

बीड /प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील हिंगणी खु.,चौसाळा, वाढवणा पूल, बोरखेड, शिंदेवस्ती पूल (बोरखेड) आदी गावांमधील पूरग्रस्त भागात मंगळवारी (दि. २३) राष्ट्रवादी कॉंग्रेसचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पाहणी केली. याच वेळी डॉ.सारिका क्षीरसागर यांनीही बीड व शिरूर कासार तालुक्यातील काही गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. दाम्पत्याने थेट बांधावर जाऊन शेतकऱ्यांना धीर दिला.

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेती उभी करणे कठीण झाले आहे. या नुकसानीची माहिती डॉ. क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना सादर केली आहे.

आज (दि.२४) अजितदादा पवार यांचा दौरा होण्याची शक्यता असून ते प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. तातडीने मदत जाहीर करण्यासंदर्भात ते निर्णय घेतील, अशी माहिती डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांशी बोलताना दिली. त्यांनी पुढे म्हटले की, पूरस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळावी यासाठी सरकार हालचाल करत आहे. ऑगस्टमधील नुकसानीसाठी ५६ कोटी रुपयांचे अनुदान जिल्ह्याला मिळाले आहे. सप्टेंबरमधील पंचनामे पूर्ण होताच मदत दिली जाणार आहे, असेही डॉ.क्षीरसागर म्हणाले.





डॉ.सारिका क्षीरसागर यांची बीड, शिरूर कासार तालुक्यातील गावांमध्ये पाहणी

डॉ.सारिका क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील राजुरी, बहादरपूर, साक्षाळपिंपरी तसेच शिरूर कासार तालुक्यातील कमलेश्वर धानोरा आदी गावांमध्ये नुकसानग्रस्त शेती, रस्त्यांची पाहणी केली. दरम्यान, आज (दि. २४) त्या गात शिरापूर, हाजीपुर, गाजीपूर, आर्वी, फुलसांगवी व मार्कडवाडी या गावांना भेट देणार आहेत.

## 'कल्पतरू'चा दांडिया कार्यक्रम पुढे ढकलला

जिल्ह्यातील सलग पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असल्याने बीड शहरातील 'कल्पतरू' आयोजित 'नवजलसा दांडिया' कार्यक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा कार्यक्रम २५ सप्टेंबर रोजी होणार होता. नवीन तारीख लवकरच जाहीर केली जाईल, अशी माहिती सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांनी दिली.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आ. विजयसिंह पंडित यांच्यासह शिवछत्र परिवार सरसावला

## सिंदफणा आणि गोदाकाठच्या नागरीकांनी सतर्क रहावे - आ. विजयसिंह पंडित यांचे आवाहन

गेवराई /प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदार संघातील अनेक गावांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक गावांचे संपर्क तुटले असून सिंदफणा नदीच्या पात्रात ठिकठिकाणी अनेक लोक अडकल्याचे चित्र आहे. या गंभीर परिस्थितीत आ. विजयसिंह पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यासह संपुर्ण शिवछत्र परिवार पुरग्रस्तांच्या मदतीसाठी सरसावला आहे. मौजे नांदुर हवेली येथे रात्री सव्वाबारा वाजता पुरात अडकलेल्या १६ नागरीकांची सुटका आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातून करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत एनडीआरएफ ची टीम आणि प्रशासन यासाठी प्रयत्न करत होते. आ. पंडित यांनी उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांना थेट संपर्क करून पूरपरिस्थितीचे गांभीर्य सांगून मदत कार्याची माहिती दिली. ना. पवार यांच्या निर्देशाने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी एनडीआरएफ सह सैन्यदलाची टीम बीडमध्ये दाखल झाली आहे. आ. पंडित यांनी सिंदफणा आणि गोदावरी नदीकाठच्या नागरीकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघामध्ये गोदावरी आणि सिंदफणा नदीने उग्ररुप धारण केल्यामुळे पूरग्रस्त परिस्थिती गंभीर बनली आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आमदार विजयसिंह पंडित यांच्यासह संपुर्ण शिवछत्र परिवार पूरग्रस्त भागात ठाण मांडून उभे आहेत. आ. विजयसिंह पंडित यांनी पिंपळगाव कानडा, आहेरचिंचोली, खामगाव आणि नांदूर हवेली या सिंदफणा नदीच्या पाण्याने वेढलेल्या परिसरात पुरात अडकलेल्या अनेक लोकांची प्रशासनाच्या मदतीने सुटका करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसिलदार चंद्रकांत शेळके, तहसिलदार संदिप खोमने यांच्यासह प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. आ. पंडित यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांना परिस्थितीचे गांभीर्य सांगितल्यानंतर त्यांनी प्रशासनाला सक्त सूचना दिल्या, त्यानंतर एनडीआरएफ च्या २६ जवानांची टीम सोमवारी रात्री उशिरा कार्यरत झाली. गाळ, चिखल आणि पाण्यातून त्यांनी पुरात अडकलेल्या नांदुर हवेलीतील १६ नागरीकांची सुखरूप सुटका केली. रात्री उशिरापर्यंत आ. विजयसिंह पंडित घटनास्थळी ठाण मांडून होते. सुटका झालेल्या नागरीकांनी आ. पंडित यांचे गहिवरून आभार व्यक्त केले.



मौजे कुर्ला येथील भिल्ल वस्तीवर अडकलेल्या सुमारे पन्नासहून अधिक रहिवाशांची सैन्य दलाच्या जवानांनी सुटका केली. पिंपळगाव कानडा येथील शेतवस्तीवर राहणाऱ्या लोकांच्या सुटकेसाठी हेलिकॉप्टरची व्यवस्था करावी लागणार होती मात्र माजलगाव येथील कहार समाजाच्या बांधवांनी शर्तीचे प्रयत्न करून त्यांची सुटका केली. नांदुर हवेलीतील सरवदे कुटूंबातील सुमारे ७ सदस्यांना पाण्यातून बाहेर काढण्याचे काम एनडीआरएफच्या जवानांनी केले. मौजे सिरसमार्ग येथील शेतात अडकलेल्या वयोवृध्द दोन नागरीकांची एनडीआरएफ च्या जवानांनी सुखरूप सुटका केली. यापैकी बहुतांशी ठिकाणी आ. विजयसिंह पंडित उपस्थित होते. त्यांनी यावेळी ग्रामस्थ, पूरग्रस्त आणि प्रशासन यांच्यामध्ये समन्वय करून तत्परतेने अडचणीत सापडलेल्या लोकांना मदतीचा हात दिला. मागील दोन दिवसांपासून आ. विजयसिंह पंडित अविरतपणे पूरग्रस्त भागात सर्वदूर फिरून सर्वसामान्य लोकांना आधार आणि धिर देण्याचे काम करीत आहेत.

इतिहासात पहिल्यांदाच सिंदफणा नदीला एवढा मोठा महापूर आल्याचे जुने लोक सांगत आहेत. अभूतपुर्व पूर परिस्थितीमध्ये संपूर्ण शिवछत्र परिवार लोकांच्या मदतीला धावून जात आहे. गोदावरी आणि सिंदफणा नदीची पाणी पातळी वाढत असून रात्री पावसाचा जोर वाढल्यास नदीकाठच्या नागरीकांनी सतर्क रहावे असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

## एनडीआरएफ सह सैन्यदलाची टीम पूरग्रस्तांच्या मदतीसाठी दाखल

# पत्रकारावर हल्ला करणाऱ्यांना कठोर शासन करा

## महाराष्ट्र पत्रकार संघ,मुबई व गौराई पत्रकार संघ गेवराई च्या वतीने निषेध नोंदवत तहसीलदार यांना निवेदन सादर



गेवराई /प्रतिनिधी

त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक याठिकाणी पत्रकार हे वृत् संकलन करण्यासाठी गेले असता यांच्यावर हल्ला करण्यात आला असून या प्रकरणातील मारहाण करणाऱ्यांना कायदेशीर कार्यवाही करून कठोर कार्यवाही करण्यात यावी मागणीचे निवेदन महाराष्ट पत्रकार संघ,मुंबई संलग्न गौराई पत्रकार संघ गेवराई च्या वतीने तहसीलदार गेवराई यांना देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर याठिकाणी वृत्त संकलन करण्यासाठी गेलेले पुढारी न्यूज चे प्रतिनिधी,किरण ताजने,पत्रकार योगेश खरे,पत्रकार अभिजित सोनवणे यांना अडवणूक करून गुंडपरवृतीच्या लोकांकडून मारहाण झाली असून मारहाण करणाऱ्या गुंडावर पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा व त्यांना कठोरात कठोर शासन करावे अशी मागणी करण्यात येत आहे.या हल्ल्याच्या निषेधार्थ.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे संस्थापक तथा राज्य संघटक संजय भोकरे साहेब प्रदेशाध्यक्ष श्री गोविंद वाकडे सर प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे साहेब आणि प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी सर तसेच गेवराई तालुका अध्यक्ष अंकुश आतकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आपणास तसेच आपणा मार्फत शासनास निवेदन देण्यात आले यावेळी महाराष्ट्र पत्रकार संघाचे गेवराई तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे,विभागीय उपाध्यक्ष सुनील पोकळे,जिल्हा उपाध्यक्ष बापू गडेकर,पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे तालुकाअध्यक्ष तुळशीराम वाघमारे,कार्याध्यक्ष विष्णु राठोड,विशेष प्रतिनिधी राजाभाऊ वटकर,पत्रकार विनोद नरसाळे,पत्रकार भास्कर हातागळे,पत्रकार जितेंद्र खरात,पत्रकार प्रियांका पाटणी,यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# महाराष्ट्र लोकसेवा गट ब परीक्षेत आष्टीचा डंका

निखिल हंबर्डे राज्यातून दुसरा

आष्टी - (प्रतिनिधी) महाराष्ट्र लोकसेवा गट ब परीक्षेत आष्टीचा डंका वाजला असुन निखिल रमाकांत हंबर्डे हा राज्यातून दुसरा आला आहे. सहाय्यक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षकपदी निवड झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात आष्टी येथील सुपुत्र निखिल पुष्पा रमाकांत हंबर्डे यांनी दैदिप्यमान यश मिळवले आहे. त्यांनी सहाय्यक कक्ष अधिकारी (मंत्रालय) आणि राज्य कर निरीक्षक या दोन्ही अत्यंत प्रतिष्ठेच्या पदांसाठीच्या परीक्षेत संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून दुसरा क्रमांक पटकावला आहे. निखिल हा आष्टी येथील जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागातील सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता रमाकांत हंबर्डे यांचे चिरंजीव आहेत तर साप्ताहिक आष्टी चित्रदर्शन चे संपादक अनंत हंबर्डे यांचे नातू आहेत. एका अभ्यासू आणि प्रतिष्ठित घराण्याचा वारसा त्यांनी आपल्या कर्तृत्वाने पुढे नेला आहे. निखिलच्या या नेत्रदीपक यशामुळे त्यांच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे. निखीलच्या या यशाबद्दल सर्व नातेवाईक, मित्रमंडळी आणि समाजातील सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. निखलच्या या यशाबद्दल आ. सुरेश धस, माजी आ. साहेबराव दरेकर, जेष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे यांनी निखिल यांचे अभिनंदन केले आहे. निखिलने मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील इतर तरुणांसाठी एक मोठे प्रेरणास्थान ठरले आहे. महाराष्ट्र लोकसेवा गट ब परीक्षेत निखील राज्यात व्दितीय आला आहे. निखीलचे प्राथमिक शिक्षण जि. प. प्रा. शाळा आष्टी, ५ वी ते १० वी पर्यत पंडीत जवाहरलाल नेहरु विद्यालयात नंतर लातुर येथील दयानंद महाविद्यालयात ११ वी व १२ वी पर्यंत शिक्षण घेतले आहे. बारावीला ९५



टक्के गुण मिळवुन विशेष यश प्राप्त केले होते. पुणे येथील सीओईपी इंजिनियरींग कालेजमधुन इंजिनियरींग पदवी मिळवली होती. दोन वर्षे इमरसन्स कंपनीत जाब केला आहे. दरम्यान ही महाराष्ट्र लोकसेवा गट ब परीक्षा दिली होती, या परीक्षेत घवघवीत यश संपादन करुन राज्यात व्दितीय क्रमांक पटकावला आहे. निखीलच्या या यशाबद्दल नातेवाईक व मित्रपरिवाराकडुन अभिनंदन होत आहे.

# पाटोद्यात ढगफुटीने हाहाकार

## आहे ती पीके उध्दवस्त, अनेकांच्या घरात पाणी घुसले
## पाटोदा शहरातील अनेक कार्यालयात पाणी घुसले

पाटोदा, प्रतिनिधी:- बीडजिल्ह्यात रात्री पुन्हा मुसळधार पाऊस पडला. या मुसळधार पावसाने पाटोदा तालुक्यात हाहाकार माजवला. आहे त्या शेती पिकांचे नुकसान झाले. मांजरा नदीला महापूर आल्याने नदी काठची शेती पुर्णतः खरडून वाहून गेली. नदीचे पाणी गावात घुसल्यामुळे अनेक नागरीकांच्या घरातील संसारोपयोगी साहित्य खराब झाले त्याच बरोबर काही शासकीय कार्यालयातही पाणी जमा झाल्याने तिथेही मोठे नुकसान झाले. सकाळी १२ ते १ वाजेपर्यंत पाणी कमी झाले नव्हते.

रात्री पाटोदा तालुक्या मुसळधार पाऊस पडला. ढगफुटीसदृष्य पाऊस पडल्याने तालुक्यातील आहे ती शेती पुर्णतः पाण्यात गेली. कापूस,



सोयाबीन, बाजरी, मुग उडीद ही पिके उध्दवस्त झाले. मांजरा नदीला महापूर आल्याने नदीने धोक्याची पातळी ओलांडली होती. नदीच्या काठी असलेल्या जवळपास १०० ते १५० एक्कर शेती पूर्णतः वाहुन गेली आहे. शासकीय कार्यालयात देखिल पाणी घुसले होते. एचडीएम वसीमा शेख, तहसिलदार दत्तात्रय निलावाड, तलाठी भालेकर, नगरसेवक यांनी

अनेक ठिकाणी जावून अडकलेल्या नागरीकांना बाहेर काढण्यासाठी मदत केली. त्याच बरोबर जयदत्त धस यांनी नुकसानग्रस्त भागांचीपाहणी केली. मुख्याधिकारी अभय जोशी, नगराध्यक्ष राजु जाधव, सोमनाथ कोल्हे यांनी घटनास्थळी जावून मदत केली.

# आर.पी.आय महायुतीचा सत्तेतील घटक पक्ष असून काय फायदा

बीड प्रतिनिधी: गायरानाच्या प्रश्नावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांनी बीडमध्ये भव्य महाधरणे आंदोलन केले, हेच दाखवते की सत्तेत असूनही भारतीय जनता पार्टी अपयशी ठरली आहे. जनतेच्या मूलभूत हक्कांसाठी महाधरणे करावे लागणे म्हणजे महायुती सरकारच्या निष्क्रियतेचा पुरावा आहे.

महायुतीत सहभागी असूनसुद्धा जनतेच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असेल, तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांना महायुतीत राहण्याचा काहीही नैतिक अधिकार



नाही. त्यांनी तात्काळ महायुतीतून बाहेर पडून लोकशाहीचा व सामाजिक न्यायाचा खरा लढा उभारावा.


अजय सरवदे

जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड

# चिंचाळा, शेकापूर, बेलगाव, देसुर, बीडसांगवी परिसरात अतिवृष्टीचा तडाखा

शेती पाण्याखाली, पिकांचे मोठे नुकसान

आष्टी - (प्रतिनिधी) गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे चिंचाळा, शेकापूर, बेलगाव, देसुर, बीडसांगवी परिसरात नद्या व नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. या पुराच्या पाण्यामुळे नदीलगतच्या तसेच नाल्यालगतच्या शेतीत मोठ्या प्रमाणात पाणी शिरले असून शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान



झाले आहे. पूराच्या पाण्यात कांदा, सोयाबीन, तूर, मका या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.

काही भागात शेतीतील मातीही वाहून गेल्याने भविष्यात पिकांची पेरणी करणे कठीण होणार असल्याची भीती व्यक्त होत आहे. शेतकरी वर्गासमोर हाती आलेले पीक वाया जाण्याबरोबरच पुढील हंगामासाठी जमिनीची सुपीकता टिकवणे ही मोठी समस्या उभी राहिली आहे. सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे हाल होत असून शासनाने तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकरी करत आहेत. या पुरस्थितीमुळे चिंचाळा, शेकापूर, बेलगाव, देसुर व बीडसांगवी परिसरातील रस्त्यावरील वाहतूकही ठप्प झाली आहे. काही गावांचा संपर्क तुटला असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

# जिल्हा कृषि अधिक्षकांनी केली शिरुर तालुक्यातील पीक नुकसानीची पाहणी

शिरूर /प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील होत असलेल्या अतिवृष्टी च्या पावसाने रायमोह महसुली मंडळातील अनेक गावांतील प्रत्यक्ष शेतात जाऊन झालेल्या नुसकानीची पाहणी केली.रायमोह मंडळात १२२ मी.मी.झालेल्या सर्वाधिक पावसाने खरिप हंगामी कपाशी,तुर,सोयाबिन सह सर्वच पीके पाण्यात आहेत,नद्या-ओढ्यातील पुरांचे पाणी शेतात जाऊन पिकांसह जमीन खरडून गेली आसल्याने, शेतातील किमान २ फुटांपर्यत साचलेले पाणी यामुळे शेतक-यांचे,पशूधनांचे प्रचंड नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

यावेळी हिवरसिंगा, खोकरमोहा, रायमोह या ठिकाणच्या नुकसानीची पाहणी केली.यावेळी शिवराम राऊत (अध्यक्ष शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा ) यांच्या वतीने



मौ.हिवरसिंगा हे रायमोह महसुली मंडळातील गाव असुन सुमारे १२२ापाऊस झाल्याने खरिप हंगामी सर्वच पीकांचे ८५%पेक्षा अधिक वाया गेले आहेत. त्यामुळे अतिवृष्टी मध्ये रायमोह मंडळाचा समावेश करून शेत-यांना छऊठक्र व डऊठक्रच्या कालबाह्य निकशापेक्षा अधिक मदत करणे.खरिप हंगामी हा पूर्णपणे वाया गेला असल्याने इतर सर्व जाचक अटि वगळून पीकविमा मंजूर करणे.सन २०२५चा खरिप हंगामी हा अतिवृष्टीने वाया गेला शेतीसाठी खर्च होऊन ही उत्पादन मिळणार नसल्याने किमान ३/४ वर्ष शेतक-यांची परिस्थिती पूर्वपदावर येणार नसल्याने कर्जमाफी करण्याची शासनाकडे शिफारस करण्याची निवेदने करण्यात आली.या बाबतीत प्रशासनाकडून पंचनामे युद्धपातळीवर चालू आहेत.लवकरच अहवाल शासनाकडे सादर करून पीडित शेतक-यांना न्याय देण्याचा प्रयत्न असेल.यावेळीश्री.फरताडे सर (कृषि पर्यवेक्षक) श्री.दत्तात्रय शिंदे (मा.सरपंच ) श्री.दत्तात्रय माळी (कृषि विभाग) श्री.गणेश बडे (तलाठी) श्री.संदिपान जाधव (कृषि सहाय्यक) श्री.महादेव सानप (मा.सरपंच) श्री.शिवराम राऊत श्री.विठ्ठल देवकर, शिवाजी सालपे,भरत नांगरे, धर्मराज गवळी, साईनाथ टाकसाळ,अशोक जगदाळे, कल्याण सालपे,अप्पासाहेब शिंदे,गणेश शिंदे,अशोक शिंदे,अंकुश दुधाळ सह शेतक-यांची उपस्थिती होती.

# जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसान भरपाई द्या

धारूर /प्रतिनिधी

अतिवृष्टीने नुकसान झालं अद्याप जिल्ह्यात नुकसान भरपाई नसल्याचे सांगत ओला दुष्काळ जाहीर करा या मागणीसाठी शुक्रवारी धारूर येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंचच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करणार असल्याची माहिती डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी दिली.

या बाबतीत डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी सांगितले की, अतिवृष्टी ने शेती मलाचे संपूर्ण नुकसान झाले आहे. पंचनामे करण्यात वेळ न घालता थेट मदत द्या त्याच बरोबर घरकुल हप्ते तातडीने द्या. निराधार अनुदान तातडीने द्या, या व इतर अनेक मागण्यासाठी धारूर येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनास हजारोच्या संख्येने




उपस्थित रहाण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच धारूर तालुका अध्यक्ष राकेश सिरसट, तुषार भालेराव, सचिन साळवे, छोटया गायसमुद्रे, अमोल शिरसट यांनी केलं आहे. या बाबतीत तहसीलदार धारूर यांना निवेदन दिलं असल्याची माहिती राकेश शिरसट यांनी दिली.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आ. विजयसिंह पंडित धावले

## खामगाव आणि नांदूर हवेली येथील पुरातन अडकलेल्या लोकांच्या सुटकेसाठी शर्थीचे प्रयत्न

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये गोदावरी आणि शिंदफणा नदीने उग्र रुप धारण केल्यामुळे परिसरात पूरग्रस्त परिस्थिती गंभीर बनली असून माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी पूरग्रस्त परिसराचा दौरा करून पूरग्रस्तांना दिलासा दिला. आ. विजयसिंह पंडित यांनी बीड तालुक्यातील आणि गेवराई विधानसभा मतदारसंघातील खामगाव आणि नांदूर हवेली या सिंदफणा नदीच्या पाण्याने वेढलेल्या परिसराला भेट दिली असून त्यांनी पुरात अडकलेल्या अनेक लोकांची प्रशासनाच्या मदतीने सुटका करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह प्रशासनातील अधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नाथसागरातून सोडलेल्या पाण्याच्या पाण्यामुळे गोदावरी नदीपात्रात पूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे राक्षस गोदावरी नदी काठावरील अनेक गावांना याचा तडाका बसला आहे त्याचबरोबर गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या सिंदफणा



नदीमध्येही आज अचानक वाढलेल्या पाण्यामुळे पूरस्थिती गंभीर बनली. पूरग्रस्त भागाचा माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांनी दौरा केला. आ. विजयसिंह पंडित यांनी बीड तालुक्यातील खामगाव आणि नांदूर हवेली या ठिकाणी दुपारी भेट दिली. चार तास थांबून प्रशासनाच्या मदतीने पुरात अडकलेल्या लोकांच्या सुटकेसाठी शर्थीचे प्रयत्न केले. शेतकरी आणि नागरिकांनी घाबरून जाऊ नये. प्रशासकीय मदत मिळवून देण्यासाठी आणि झालेल्या नुकसान भरपाईसाठी आपण प्रयत्न करू असे सांगून लोकांना धीर न सोडण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह महसूल मंडळाचे अधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेवराई नगर परिषद प्रशासनाचे तसेच विद्युत विभागाचे मानले आभार:- पत्रकार शेख जावेद सर

**गेवराई(प्रतिनिधी):- मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांच्या कल्पनेतून व्हाट्सएपच्या सहाय्याने तक्रार निवारण केंद्र सुरू केले आहे या निवारण केंद्राला चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे.**

**जे काम नगर सेवकाला जमले नाही ते काम माजी आमदार अमरसिंह पंडित साहेबाचे खंदे समर्थक सर्वसामान्य घरातील पत्रकार शेख जावेद सर यांनी केले या बद्दल या भागात पत्रकार शेख जावेद सर ची चर्चा होत आहे.**

गेवराई रंगार चौक येथील रहिवासी तसेच जागरूक पत्रकार शेख जावेद सर यांनी दोन दिवसा पूर्वी या निवारण केंद्रावर त्या भागातील विद्युत विभागातील ऑनलाइन तक्रार दाखक केली होती आज रोजी नगर परिषद चे विद्युत विभागाचे कर्मचारी शेख जावेद व बळीराम भोले यांनी या भागात



येऊन पाहणी करून या भागातील तीन ठिकाणी विद्युत पोल वर मर्क्युरी बसवून या तक्रारींचे निराकरण केले

या वेळी याभागाती पत्रकार शेख जावेद सर,शेख अरबाज डांगे, शेख असजद, शेख जब्बार बागवान हे उपस्थित होते या वेळी यांनी नगर परिषद चे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके ,विद्युत विभागाचे अभियंता राहुल राजपूत,विद्युत विभागाचे कर्मचारी शेख जावेद व बळीराम भोले कंत्राटी कर्मचारी संकेत राठोड यांचे आभार मानले.

# कृषि महाविद्यालयात 'दीक्षारंभ कार्यक्रम व पालक मेळाव्याचे' कुलगुरु डॉ.इंद्र मणि यांच्या हस्ते उद्घाटन

## माणसाचे वर्तन कसे असावे, बिकट परिस्थितीला सामोरे कसे जावे हे बळीराजा कडून शिकावे- डॉ.राजेश इंगोले यांचे मौलिक भाष्य

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

कृषि महाविद्यालय अंबाजोगाई येथे नुकतेच १८ सप्टेंबर रोजी, शैक्षणिक वर्ष - २०२५-२६ नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा 'दीक्षारंभ कार्यक्रम व पालक मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमांची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते बळीराजाच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटक तथा मार्गदर्शक म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.इंद्र मणि, वनामकृविचे संचालक शिक्षण, डॉ.भगवान आसेवार, अंबाजोगाई येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, सुप्रसिद्ध व्याख्याता व मानसोपचार तथा व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची विशेष उपस्थिती होती. आपल्या उद्घाटनीय मार्गदर्शन पर भाषणात कुलगुरू डॉ.इंद्र मणि म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच संस्कारही अंगीकारले पाहिजेत. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर संघर्ष करायला शिकले पाहिजे. आपण आपल्या प्राप्त केलेल्या ज्ञानाचा उपयोग सेवाभावी वृत्तीने शेतकरी आणि समाजासाठी केला पाहिजे. संचालक शिक्षण डॉ.भगवान आसेवार यांनी



विद्यार्थ्यांना व उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले. त्याप्रसंगी ते म्हणाले की, शेती हा आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे कृषि क्षेत्रातील सुधारणा, कृषि क्षेत्राचा विकास हाच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होय. याप्रसंगी सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनीही आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान विषयक मार्गदर्शन केले. त्यावेळी ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर अत्यंत डोळसपणे केला पाहिजे. समाजामध्ये हल्ली सायबर गुन्ह्यांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. त्यामुळे आपण व आपले कुटुंबीय अडचणीत येऊ नये याची खबरदारी घेतली पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून कटाक्षाने दूर राहिले पाहिजे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, विद्यार्थी हा घटक केंद्रीभूत ठेवून महाविद्यालयांनी आपली भूमिका निभावली पाहिजे. ज्ञानसंपन्न आणि संस्कारक्षम विद्यार्थी घडले तर देशही घडत असतो. तेव्हा विद्यार्थ्यांनीही अभ्यासू आणि चिंतनशील वृत्ती अंगीकारली पाहिजे. प्रमुख व्याख्याता म्हणून बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करताना आपल्या प्रेरणादायी भाषणात विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य निर्माण केले. ते म्हणाले की, दुर्दम्य इच्छाशक्ती, कठोर परिश्रम आणि चिकाटी या त्रिसुत्रीच्या बळावर यशाचं शिखर गाठता येते. संघर्ष हाच यशाचा खरा पाया आहे. संघर्षातून मिळालेले यश हे चिरकालीन टिकणारे असते. यावेळी डॉ.इंगोले यांनी आपल्या खुमासदार शैलीत जीवनामध्ये वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये माणसाचे वर्तन कसे असावे, बिकट परिस्थितीला सामोरे कसे जावे, परीक्षेमध्ये यश कसे मिळवावे, अभ्यासात सातत्य कसे, मोबाईलचे व्यसन कसे सोडावे व माणसे कशी जोडावी यावर विस्तृत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंबाजोगाई कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.संजीव बंटेवाड यांनी केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राजेश रेवले यांनी केले. तर उपस्थितांचे आभार विद्यार्थिनी प्रतिनिधी अभिलाषा खोडके यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पाटोदा तालुक्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची आ.सुरेश धस यांनी पाहणी करून तातडीने घेतली प्रशासनिक बैठक

पाटोदा ( प्रतिनिधी )

पाटोदा तालुक्यात दि.२१ सप्टेंबर रोजी सायंकाळी झालेल्या अतिवृष्टीजन्य पावसामुळे नदीपात्र आणि शेतजमिनीत मोठ्या प्रमाणावर पाणी साचले.यामुळे शेतकऱ्यांची शेतं, राहत्या घरं,गोठे, कांदाचाळ,पशुधन वाहून गेले किंवा पाण्याच्या प्रवाहामुळे मृत्यूमुखी पडले तसेच जलसिंचन विहिरी भुजल्या,महावितरण पोल आणि रोहित्र शेतातील उभे पीक पाण्याखाली गेले, जमिनी खरडून गेल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर तहसील कार्यालयात या बाबत तालुका प्रशासनाची बैठक घेतली.

तालुका प्रशासनाने तातडीने पंचनामे करून सर्व बाधित शेतकऱ्यांच्या शेतजमिनी,विहिरी,घरे इत्यादींचे नुकसान नोंदवून प्रशासनात सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.सर्व मंडळातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाईस पात्र मानण्यात येत आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून न जाता प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन केले.या बैठकीला उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी नगरपंचायत,तालुका कृषी अधिकारी,पोलीस निरीक्षक,गटविकास अधिकारी, उपाभियंता महावितरण, उपाभियंता जलसंपदा, उपाभियंता लघु पाटबंधारे आणि संबंधित सर्व विभागप्रमुखा सह पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक आदी उपस्थित होते.

# केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे यंदा अतिवृष्टीग्रस्तांना मदत द्या: आ. धस

**प्रतिनिधी ।पाटोदा**

**ढगपुटी तसेच अतिवृष्टी यामुळे पाटोदा, शिरूर आणि आष्टी या तीनही तालुक्यांवर मोठे संकट ओढावले आहे. ही परिस्थिती आमदार सुरेश धस यांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडली. या आपत्तीत शेतकऱ्यांची शेती, विहिरी, घरे, शाळा, स्मशानभूमी, जलसंधारण बंधारे अशा काही बाबी पूर्णपणे वाहून गेल्या आहे. राज्याची मदत याचे पुनर्वसन करण्यासाठी तुटपुंजी ठरेल. यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारच्या मनरेगा निकषांच्या बाबीचा आधार घेत शेतकऱ्यांना हेक्टरी किमान पाच ते दहा लाख रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी**



**धस यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.**

या आपत्तीत शेतकऱ्यांचे क्षेत्रच राहिलेले नाही. जमिनी खरडून गेल्या आहेत, ३० फूट खोलवरच्या विहिरी बांधकामासह वाहून गेल्या आहेत. तीन परस नदीपात्रालगतची शेती अक्षरशः नष्ट झाली आहे. ही शेती पुन्हा तयार करण्यासाठी प्रचंड खर्च येणार आहे. सध्याच्या मदतीच्या निकषांत ही मदत अपुरी ठरणार असून केवळ 'ओल्या दुष्काळाची घोषणा' करून भागणार नाही, तर त्याची तात्काळ अंमलबजावणी आवश्यक आहे.

पंचनामे सुरू

गरजूंना १५ दिवसांचे धान्य, पाच ते दहा हजारांची मदत द्यावी

सध्या नागरी वस्त्यांमध्ये नुकसान झालेल्या कुटुंबांना तहसील स्तरावर १५ दिवसांचे धान्य, तर जीवनावश्यक वस्तूनष्ट झालेल्यांना ५ ते १० हजारांची मदत प्रशासनाकडून दिली जात आहे. या बरोबरच

जनावरांच्या नुकसानभरपाई ४० हजार आणि छोट्या जनावराला २० हजार रुपयांची मदत दिली जाणार आहे. मात्र, या प्रक्रियेला ५ ते १० दिवस लागतील. असे धस म्हणाले.

असले तरी प्रशासनाला त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी अनेक दिवस लागणार आहेत. शेतीत परत पीक येण्यासाठी बाहेरून गाळ आणावा लागणार असून हे काम किमान मार्चपर्यंत पूर्ण होणे कठीण आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांना जास्तीची मदत मिळणे अत्यावश्यक असल्याचे धस यांनी या बाबी मांडतांना स्पष्ट केले. बुजलेल्या विहिरींसाठी प्रत्येकी तीन लाख आणि नव्या विहिरींसाठी जिओ टॅगद्वारे पाच लाख रुपयांची मदत तातडीने मिळावी. यावर मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी होणाऱ्या कॅबिनेट बैठकीत निर्णय होईल आश्वासन दिल्याचे त्यांनी सांगीतले.

# आष्टी येथील अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्रा.ज्ञानेश्वर बकान सेट परीक्षा उत्तीर्ण

आष्टी (प्रतिनिधी) आष्टी येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित आष्टी येथील अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्रा. बकान ज्ञानेश्वर यांनी १५ जून २०२५ रोजी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली व पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठ यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या गृहशास्त्र या विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. ही परीक्षा वरिष्ठ महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक पदासाठी अर्हता मानली जाते. यापूर्वी प्रा. ज्ञानेश्वर बकान यांनी संत लोंगवाल इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग एन्ड टेक्नोलॉजी लोंगवाल, संगरूर पंजाब या राष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या संस्थेतून आपले पदव्युत्तर पदवी (एमटेक) पर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेले आहे.

या यशाबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे. त्यांचा या यशाबद्दल आंनद चॅरिटेबल संस्थेचे



अध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे, सहसचिव डॉ. अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, संजय शेंडे, माऊली बोडखे, प्रा. सागर वाघुले, प्रा, संदीप नन्नवरे, आनंद शैक्षणिक संकुलातील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# अंथरवन पिंपरी तांड्यात अतिवृष्टीचा कहर शेत पिकांचे घरांचे व संसार उपयोगी साहित्याचे मोठे नुकसान

## प्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शासनाकडून मदत मिळवून द्यावी - दिनेशराव पवार

बीड /प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अंथरवन पिंपरी तांडा व उमरी, उमरद खालसा, नागापूर, अंथरवण पिंपरी, खांडे पारगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेतपिकांचे नुकसान, घरांची पडझड तसेच संसार उपयोगी साहित्याची नासधूस झाली आहे. या गंभीर परिस्थितीची पाहणी करण्यासाठी अंथरवन पिंपरी तांडा येथील सामाजिक कार्यकर्ते दिनेशराव पवार यांनी थेट शेतशिवारात जाऊन शेतकर्यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन प्रशासनाने शासनाकडून तात्काळ मदत मिळवून द्यावी अशी मागणीही त्यांनी केली आहे.

अंथरवण पिंपरी तांडा परिसरातील शेतकरी बांधवांशी संवाद साधताना पवार म्हणाले की, शेतकर्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. घरांची पडझड व अन्नधान्य नष्ट झाल्याने जनतेवर मोठे संकट कोसळले आहे. या तांड्यावरील आश्रमशाळेत इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत अनेक विद्यार्थी उमरी, उमरद खालसा, नागापूर, अंथरवण पिंपरी, खांडे पारगाव येथून शिक्षण घेण्यासाठी येतात, अतिवृष्टीमुळे या भागातील रस्ते वाहून गेल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. शासनाकडून तात्काळ मदत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून सर्व शेतकर्यांना भरपाई मिळवून द्यावी. तसेच या तांड्यावर विमुक्त जाती व भटक्या जमातीचे ऊसतोड कामगार रहातात. त्यांची कच्चे बांधकाम केलेली घरे असून निसर्गाच्या कोपामुळे काही घरे ढासळली आहे तर काही ढासळण्याच्या मार्गावर आहेत. कसलीही जीवीत हानी होऊ नये यासाठी प्रशासनाने तात्काळ या भागाची पहाणी करून पुरग्रस्त बाधीतांना शासनाकडून ज्या प्रमाणे विशेष बाब म्हणून ज्या सोयी सुविधा दिल्या जातात, त्याच सोयी-सुविधा अंथरवण पिंपरी तांडा येथील नुकसानग्रस्त व गोरगरीब कुटूंबांना द्याव्यात जेणे करुन त्यांचे संसार उघड्यावर पडणार नाहीत याची काळजी प्रशासन-शासनाने घ्यावी व तात्काळ मदत करावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिनेशराव पवार, रामभाऊ पवार, पांडुरंग पवार, जेमा पवार, पोमा राठोड, शामा राठोड, बाबुराव पवार आदींनी केली आहे.

# मराठवाड्याला नैसर्गिक आपत्ती घोषित करा - भाई अॅड. नवले यांची मागणी

बीड (प्रतिनिधी)-मराठवाड्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकर्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, संपूर्ण भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचे नेते अॅड. भाई राजेंद्र नवले यांनी बीड व धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा नैसर्गिक आपत्तीग्रस्त म्हणून जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच शेतकर्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची मदत देण्याची मागणी केली असून मागणी मान्य न केल्यास २ ऑक्टोंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी बीड यांचे कार्यालयाच्या दारात तीव्र निदर्शने करण्यात येईल असा इशारा भाई अॅड. नवले दिला आहे.

अॅड. नवले यांनी बीडचे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य सरकारकडे निवेदन सादर करताना, शेतकर्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची मदत देण्याची मागणी केली. या निवेदनात त्यांनी स्पष्ट केले आहे की, सध्याच्या पावसामुळे शेतजमिनी, उभे पिक, घरे, जनावरे यांचे मोठे नुकसान झाले आहे. बळीराजा आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाला आहे. या परिस्थितीत तातडीने मदतीची गरज आहे.

ते पुढे म्हणाले की, राज्य शासनाने आठ दिवसांच्या आत या मागण्यांवर ठोस निर्णय न घेतल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

सद्यस्थितीत मराठवाड्यातील अनेक तालुक्यांत अवकाळी व सततच्या पावसामुळे शेतीचाच नव्हे तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचाही मोठा फटका बसत आहे. त्यामुळे राज्य शासन या मागणीकडे गांभीर्याने पाहेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करून तात्काळ शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या - डॉ ज्योती मेटे

बीड (प्रतिनिधी) अतिवृष्टीमुळं शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचे पावसामुळे झालेले नुकसान लक्षात घेता सरकारने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी अशी मागणी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कृषी मंत्री यांच्या कडे केली आहे.



राज्यात सध्या मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. मराठवाड्यासह जळगाव, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव, बीड या जिल्ह्यांत अतिवृष्टीने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. बीड जिल्ह्यात पावसामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पावसाने कहर केला तर पुढील संपूर्ण आठवडा पावसाचा असणार आहे. तसेच, शुक्रवारनंतर पावसाचा जोर आणखी वाढणार असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे. या मुसळधार पावसाने मोठ्या प्रमाणावर शेतीपिकांचं नुकसान झालं आहे. दरम्यान, आधी अवकाळी आणि आता अतिवृष्टीमुळं शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचे पावसामुळे झालेले नुकसान लक्षात घेता सरकारने शेतकऱ्यान मदत करावी

# जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची पडताळणी होणार - राजेंद्र लाड

## दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या वतीने आदेशाचे स्वागत

आष्टी - (प्रतिनिधी) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम - ९१ अन्वये जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्रांची (युडीआयडी कार्ड) पडताळणी करण्यात येणार आहे. विभागाकडून त्याबाबतच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या आहेत. दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्र वैधतेबाबत विभागास अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने ही पडताळणी करण्यात येत असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले आहे.

जिल्हा परिषदांमधील संबंधित सर्व विभागांतर्गत शिक्षण, आरोग्य, बांधकाम तसेच सर्व विभागात कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करून लाक्षणीक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींनाच शासनमान्य लाभ देण्यात येणार आहेत. पडताळणीअंती बनावट व नियमबाह्य प्रमाणपत्र किंवा ४० टक्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असल्याचे आढळल्यास संबंधितांना लाभ अनुज्ञेय केला जाणार नाही. अशा व्यक्तींना दिलेले लाभ बंद करण्यात येतील व त्यांनी घेतलेल्या लाभाबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम - ९१ नुसार, अपात्र व्यक्तीने लाभ घेतल्यास किंवा घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यास दोन वर्षांपर्यंत कारावास, एक लाखापर्यंत दंड किंवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतात. त्यामुळे पडताळणीअंती अपात्र ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांवर संबंधित तरतुदीनुसार कठोर कारवाई केली जाणार आहे. अशी माहिती शासन मान्य महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड यांनी दिली आहे.

राज्यातील बोगस दिव्यांगांची झाडाझडती घेण्याचे लेखी आदेश गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी राज्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी राज्यातील सर्व ३४ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत. हे आदेश मिळताच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिव्यांग प्रमाणपत्रांच्या पडताळणीला सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे झेडपीच्या शिक्षण, आरोग्य, बांधकाम विभागासह सर्व विभागांतर्गत असलेले सर्व अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचा समावेश आहे. यामुळे बोगस प्रमाणपत्र घेणार्या कर्मचार्यांचे धाबे दणाणले असून प्रमाणपत्र देणार्या अधिकार्यांची झोप उडाली आहे.

या पडताळणीचा अहवाल महिनाभरात सर्व झेडपीच्या सर्व सीओंकडून दिव्यांग कल्याण आयुक्तांना सादर करण्याचे निर्देशही तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कलम ९१ अन्वये बोगस दिव्यांग व्यक्तीला दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षांसाठी पात्र ठरतो. राज्यात बोगस दिव्यांगांचा आकडा वाढला आहे. जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असणार्या दिव्यांग अधिकारी व कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेतात. याबद्दलच्या विभागास अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींमध्ये दिव्यांगांच्या वैश्विक ओळखपत्राबाबत साशंकता व्यक्त केली आहे. त्यामुळे राज्यातील सर्वच एकूण ३४ जिल्हा परिषदेतील दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याचे निर्देश दिव्यांग कल्याण विभागाने दिले आहेत. या आदेशाचे शासन मान्य महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या वतीने स्वागत



करण्यात येत आहे तसेच दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे साहेबांचे हा महत्त्वाचा आदेश काढल्याबद्दल आभार व्यक्त करण्यात येत आहेत असेही शेवटी राजेंद्र लाड यांनी म्हटले आहे.

# खा.बजरंग सोनवणे पुरग्रस्तांच्या भेटीला

## मदत मिळवून देण्या साठी प्रयत्न करण्याचा दिला शब्द, शेतकऱ्यांचे पुसले अश्रू,केज, अंबाजोगाई तालुक्यात दिल्या भेटी

केज/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे.मंगळवारी पहाटे जिल्ह्यातील५७ महसूल मंडळात अतिवृष्टी झालीअसून खा.बजरंग सोनवणे मागील आठ दिवसांपुर्वी झालेल्या अतिवृष्टीची पाहणी करून दिल्लीला गेले होते.यानंतर मागे पुन्हा अतिवृष्टी झाल्याने ते तातडीने मंगळवारी सकाळी बीडला रवाना झाले.यानंतर दुपारी त्यांनी धानोरा,देवळा ता.अंबाजोगाई आणि इस्थळ ता.केज येथे अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली.बीड जिल्ह्यात दि.१४ सप्टेंबर पासून अतिवृष्टी होत आहे. पहिल्यांदा अतिवृष्टी झाली तेव्हा तातडीने खा.बजरंग सोनवणे यांनी बांधावर जाऊन पिकाची पाहणी केली होती.यानंतर काही दिवसांनी पाऊस थांबला होता.दरम्यान, खा.बजरंग सोनवणे हे दिल्ली येथे जिल्ह्याच्या विकास कामाच्या निमीत्ताने गेले होते. यानंतर बीड जिल्ह्यात पावसाने सुरूवात केली सलग तीन दिवसा पासुन बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झालेली आहे. यामुळे नद्याना महापूर आलेला आहे.या पुरात शेती आणि पिकेही वाहून गेली आहेत. अनेक शेतकऱ्यांचे पशुधनही वाहून गेले असून कोट्यावधी रूपयांचे नुकसान झालेले आहे.मागील काही दिवसांपासून शेतात पाणी असल्याने पिके पिवळी पडत आहेत.शिवाय पुरामुळे शेती खरडून गेली असून आता पुन्हा शेतकऱ्यांनी शेती करायची कशी असा प्रश्न आहे.मंगळवारी खा.बजरंग सोनवणे हे दिल्लीवरून शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी परतले. यानंतर त्यांनी केज आणि अंबाजोगाई तालुक्यातील विविध गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी नुकसान ग्रस्त शेतकरी,आणि ग्रामस्थांशी संवाद साधला.कोणतीही अडचण वाटली तर संपर्क करा,तुम्हाला शासनस्तरावर मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करू, वेळप्रसंगी शासनाला भांडू परंतु मदत मिळवून देऊ,असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.



### आज पाटोदा,शिरूर बीड दौरा

खा.बजरंग सोनवणे हे आज पाटोदा,शिरूर आणि बीड तालुक्यातून वाहणाऱ्या मोठ्या नद्या मुळे झालेल्या नुकसानी ची पाहणी करणार आहेत.पाटोदा,शिरूर शहरात पाणी शिरूर त्याठिकाणी व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान झाले होते. त्याठिकाणी देखील ते भेटी देणार आहेत.तर बीड तालुक्यात सिंदफणामुळे जिथे नुकसान झाले आहेत, अशा ठिकाणी शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

# बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्या –खा.रजनीताई पाटील

केज/प्रतिनिधी

मागील पंधरा दिवसा पासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.शेतकऱ्यांची शेती मातीसकट वाहून गेली आहे.जनावरे गुरे वाहून गेली आहेत.बीड जिल्ह्यात ओलादुष्काळ जाहीर करून सरसकट ५० हजार रुपये शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.रजनीताई पाटील यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी ५० हजारांची मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे.सध्या बीड जिल्ह्यात सर्वच तालुक्यात पावसाने मोठे नुकसान झाले असुन सोयाबीन, कापुस पुर्णतः हातातुन गेले आहे.नदीकाठचे घरे,जनावरे वाहुन गेली असुन प्रत्येक गाव या अतिवृष्टीने बाधित झाले आहे कोणतेही पंचनामे न करता जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची अर्थिक मदत तात्काळ द्यावी सद्यस्थितीत जिल्ह्या तील सर्वच नद्या आपले पात्र सोडुन १ ते १.५ कि.मी क्षेत्रातुन वाहत आहेत त्यामुळेअतोनात नुकसान झाले आहे. अनेक गावात पाणी शिरले असुन जनावरांचे गोठे वाहुन गेले असून पशुधनाची देखील जिवीत हानी झाली आहे.त्यामुळे आपण सबंध जिल्हा ओला दुष्काळ म्हणून जाहिर करावा व ज्याची घरे, जनावरे वाहुन गेली त्यांना वेगळी वेगळी मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे.अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीमुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे. करिता शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळाली पाहिजे थेट मुख्यमंत्र्यांकडे त्यांनी याबाबत मागणी करून संवाद साधला आहे.

पुढे बोलताना खा. पाटील म्हणाल्या की, शासनाने तत्परतेने कार्यवाही केली नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल.त्यामुळे प्रशासनाने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची



गरज आहे. शासनाच्या विविध योजनांमधून तसेच आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मदत देण्यात यावी,अशी मागणी त्यांनी केली.

शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार खा.रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळे पर्यंत पाठपुरावा करत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# राष्ट्राच्या आरोग्य दृष्टिकोनात बदल घडवण्यासाठी संपूर्ण देशभरात महिला आरोग्य तपासणी उपचार सेवा आणि पोषण यावर विशेष भर

अंबाजोगाई प्रतिनिधी

दि..२३ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र भावठाणा तालुका अंबाजोगाई येथे महिलांसाठी स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले या भव्य शिबिर मध्ये १०६ लाभार्थी ची मोफत तपासणी करण्यात आली .यामध्ये उपचार चिकित्सालय मार्गदर्शन तालुका आरोग्य अधिकारी डॉ श्री बालासाहेब लोमटे सर .वैद्यकीय अधिकारी डॉ श्री शिवराज थोरात व डॉ प्राजक्ता गायकवाड आरोग्य सहाय्यक श्री संजयकुमार गायके सर , चांगुणा लेमटे आरोग्य सहायिका, आरोग्य सेवक श्री बालाजी वाघमारे व श्री महादेव मस्के ,मु. युवा प्र. श्री गणेश गडदे, डाटा ऑपरेटर निशा शिरसाट ,आरोग्य सेविका चव्हाण ,खरटमल,राख सिस्टर, परिचर श्री सुदाम गायकवाड यासर्वांच्या सहभागाने शिबिर यशस्वी झाले.त्याचप्रमाणे गटप्रवर्तक सौ कीर्ती कुंठे मॅडम भावठाणा व आशा स्वयंसेविका सौ कविता मस्के, सौ सपकाळताई, अनिता सुरवसे ,प्रीती मस्के ,किर्ती मस्के, विजयमाला सुरवसे आशा स्वयंसेविका

# माजलगाव येथील अलोक जेधे याची विजयाची हॅट्रिक

## नांदेड येथे झालेल्या चाणक्य अबॅकस राज्यस्तरीय स्पर्धेत पटकावला प्रथम क्रमांक

वडवणी/ प्रतिनिधी -:

चाणक्य अबॅकस च्या वतीने राज्यस्तरीय अकरावी स्पर्धा परीक्षेचे नांदेड येथे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धा परीक्षेत ग्रामीण व शहरी भागातील ६५० विद्यार्थ्यांनी या ऑनलाईन कॉम्पिटिशन मध्ये सहभाग घेतला होता ही स्पर्धा नांदेड येथे गेल्या काही दिवसापूर्वी पार पडली याचा नुसताच निकाल जाहीर झाला यात माजलगाव चाणक्य अबॅकस शाखेचा विद्यार्थी अलोक बाबुराव जेधे हा प्रथम श्रेणी मधून राज्यातून पहिला क्रमांक पटकावला तर द्वितीय श्रेणीतून शाश्वत गणेश तळेकर हा राज्यातून पहिला आला तर प्राची निंबाळकर द्वितीय श्रेणी मधून राज्यातून तिसरा आला या चाणक्य अबॅकस संस्थेचे संस्थापक श्री. विजय कुसुमकर सर यांच्या अध्यक्षतेखाली स्पर्धा पार पडली

चाणक्य अबॅकस वतीने गेल्या महिन्यात नांदेड येथे राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेत राज्यातील चाणक्य अबॅकस च्या सर्व शाखेतून विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते ही स्पर्धा ऑनलाइन घेण्यात आली होती या स्पर्धेसाठी राज्यातून ६५० विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते त्या स्पर्धेचा नुसताच निकाल जाहीर झाला यात माजलगाव चाणक्य अबॅकस शाखेच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली अलोक बाबुराव जेधे हा प्रथम श्रेणी मधून राज्यातून पहिला आला तर शाश्वत गणेश तळेकर द्वितीय श्रेणी मधून राज्यातून पहिला आला व प्रची




निंबाळकर द्वितीय श्रेणी मधुन राज्यातुन तिसरा आला आहे तसेच प्रथमेश गजानन सोळंके हा विद्यार्थी तृतीय श्रेणी मधून राज्यातून पहिला आला तर सत्यजित सचिन पवार पाचवा आला अशा प्रकारे या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे चाणक्य अबॅकस च्या वतीने आतापर्यंत झालेल्या सर्व ऑनलाईन स्पर्धेत अलोक जेधे ने प्रथम क्रमांक पटकावला होता ती परंपरा कायम ठेवत या स्पर्धेतही विजयाची परंपरा कायम ठेवत विजयाची हॅट्रिक केली आहे त्यामुळे त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे अलोक जेधे यांनी आतापर्यंत अबॅकस च्या आठ लेवल पुर्ण केल्या आहेत प्रत्येक लेवलच्या स्पर्धेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला होता या स्पर्धेतही ती परंपरा कायम ठेवल्यायामुळे माजलगाव चाणक्य अबॅकस शाखेची मान उंचवली आहे नुकताच या स्पर्धेचा निकाल लागला यानंतर प्रथम क्रमांक पटविलेल्या विद्यार्थ्यांना चाणक्य अबॅकस संस्थेचे संस्थापक श्री. विजय कुसुमकर सर व माजलगाव चाणक्य अबॅकस शाखेचे श्री. ओमप्रकाश स्वामी सर व संगीत स्वामी मॅडम यांच्या हस्ते प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी सन्मान पत्र देऊन गौरवण्यात आले

# देशी गाय विकणा-यास फाशी द्या

## सदाभाऊ खोत यांची सरकारकडे मागणी

मुंबई : देशी गायीला राजमातेचा दर्जा द्या, जर कोणी विकायला निघाला, तर त्याला फाशी द्या. मात्र, जर्सी गाय, जर्सी होस्टन, म्हैस, बैल, जर्सी गायीचे खोंड, यांना अडवू नका, हे त्याच्या जगण्याचे साधन आहे, असे रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी म्हटले आहे. रयत क्रांती संघटनेच्या वतीने फलटण येथील तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. हा मोर्चा बनावट अथवा बोगस गोरक्षकांविरोधात होता. यानंतर ते बोलत होते.

खोत म्हणाले आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी या पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत हा शेतकरी चालायला तयार आहे, हे सांगण्यासाठी आम्ही ख-या अर्थाने येथे आलो आहोत. मुळात शेती हा एक व्यवसाय



आहे आणि दुध व्यवसाय हा त्याचा प्रमुख भाग झाला आहे. शेतक-याच्या घरात दहा दिवसाला दूध सोडून इतर कुठलेही येत नाहीत. परंतु काही लोक या व्यवसायात अडथळे निर्माण करीत आहेत. ग्रामीण भागात देशी गाय शेतकरी कधीही विकत नाही; देशी कायीला शेतकरी गोमाता मानतो. तो ती पाहुण्यांना, मित्रांना मोफत देतो. पण दुधाळ संकरीत गाय, जर्सी, होस्टन, म्हैसाना म्हशी या मात्र तो विकतो.

खोत पुढे म्हणाले, एका गायीपासून तीन गाई झाल्या, दोन गायींपासून पाच गायी झाल्या, तर त्यांपैकी काही, तो मुलांच्या शिक्षणासाठी, लेकीच्या लग्नासाठी, आजारपणावेली तो देत असतो. पण गोवंश हत्या कायद्याच्या आडोशाने अनेक जण गायींचे रक्षण करण्यासाठी पुढे यायला लागले आहेत आणि विकायला जाणा-या जर्सी गायींना अडवायला लागलेत. जप्त करून परत गोशाळेत न्यायला लागले आहेत. शेतकरी न्यायालयात फिरतो, गोशाळांना दोन-दोन लाख रुपये द्यावे लागतात आणि तरीही जनावरे मिळत नाहीत. यामुळे राज्यातील दुग्ध व्यवसाय मोडकळीस येईल आणि दुग्ध उत्पादक शेतकरी कर्जबाजारी होतील आणि त्यांच्या आत्महत्या सुरू होतील. म्हणून सरकारने या कायद्यात दुरुस्ती करावी लागेल आणि दही, दुधाचा कोटा वाचवावा लागेल. हे सांगण्यासाठी येथे आलो होतो

# रोहिलागड परिसरात ढगफुटी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान ज्ञानेश्वर कदम यांची विहिर कोसळली

रोहिलागड /प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील रोहिलागड परिसरात दि.२२ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पावसाने अक्षरशः ढगफुटीचे स्वरूप घेतले. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून शिवारात हाहाकार माजला आहे.रोहिलागड शिवारातील गट नंबर ३४१ मधील शेतकरी ज्ञानेश्वर शिवनाथ कदम यांच्या शेतातील विहीर मुसळधार पावसामुळे कोसळली. शेतकऱ्यांचे अनेक दिवसांच्या कष्टाने उभारलेले हे पायाभूत साधन एका क्षणात जमीनदोस्त झाले. यामुळे कदम यांच्यासह इतर शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आणि



हतबलता पसरली आहे.नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तात्काळ पंचनामा करून योग्य ती आर्थिक मदत द्यावी अशी जोरदार मागणी केली आहे. विहीर ही आमच्या शेतीसाठी जीव आहे ती कोसळल्याने आम्हाला मोठा धक्का बसला आहे.आता तरी प्रशासनाने तातडीने मदतीचे हात पुढे करावेत अशी आर्त हाक शेतकरी ज्ञानेश्वर शिवनाथ कदम

# मांजरा नदीला महापुर



केज /प्रतिनिधी

केज तालुक्यात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला असतानी केज तालुक्यातील मांजरा नदीला महापुर आल्याने नदीपात्राने नदी पात्र सोडुन दैठणा, राजेगाव, पिट्टी ,बोरगाव, गावात शिरकाव केला त्यामुळे गावातील नदीकाठच्या शेतकरयाचे शेतीचे प्रचंड नुकसाण झालेले आहे. तसेच दैठणा या गावातील शेतकरी श्री महेश मुळे याचा गायगोठा पुराच्या पाण्यात गेल्याने त्याचे लाखो रुपयाचे नुकसान झाले. गायगोठ्यात त्याचे नउ दहा जनावरे पाण्यात होते ते सुखरुप बाहेर काढले परंतु कडबाकुटी, सरकी पेड ,सुग्रास ,शेतीच्या अवजारांचे नुकसान झाले आहे .श्री रामेश्वर मुळे याचा ही गायगोठा पाण्यात जाउन त्याच ही खुप नुकसान झालेल आहे .तसेच श्री उतरेश्वर कातमांडे याच्या घरात पाणी शिरल्यामुळे त्याचही खुप नुकसान झालेल आहे त्यामध्ये घरातील गहु, ज्वारीच नुकसान झालेल आहे .

# जय महाराष्ट्र दुर्गोत्सव मंडळाच्या दुर्गा मातेची आरती धनंजय अरबुणे यांच्या हस्ते सापत्नीक संपन्न

परळी (प्रतिनिधी) - परळी शहरातील फुले चौक भागातील जय महाराष्ट्र दुर्गोत्सव मंडळ आयोजित नवरात्र महोत्सवात आज दुसऱ्या माळेची सकाळची दुर्गा मातेची आरती भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. या आरतीचा मान येथील ज्येष्ठ पत्रकार धनंजय अरबुणे यांना लाभला. त्यांनी सापत्नीक मोठ्या श्रद्धेने भक्तिभावाने आदिमाया आदिशक्तीची आरती केली.

याबाबत अधिक माहिती अशी की येथील फुले चौक भागातील जय महाराष्ट्र दुर्गोत्सव मंडळाच्या दुर्गा मातेची आरती परळीतील ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांच्या हस्ते सापत्नीक संपन्न झाली. आरतीच्या वेळी दुर्गा मातेच्या सभामंडपात भक्तिमय तथा उत्साहवर्धक वातावरण होते. ढोल-ताशांच्या गजरात आदिशक्तीच्या जयघोशामुळे वातावरण अधिकच प्रसन्न झाले होते. जय महाराष्ट्र दुर्गोत्सव मंडळाने गेल्या अनेक वर्षांप्रमाणे याही वर्षी सामाजिक बांधिलकी जपत, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून नवरात्रोत्सव साजरा करण्याचा संकल्प केला आहे.



या पार्श्वभूमीवर दांडिया-गरबा तसेच विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

याप्रसंगी जय महाराष्ट्र दुर्गोत्सव मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक वैजनाथराव सोळंके, मंडळाचे अध्यक्ष संतोष साखरे, मंडळाचे पदाधिकारी महादेव जाधव, पत्रकार श्रीराम लांडगे, दीपक देशमुख, वैभव देशमुख, बळीराम साखरे, ओमकार जाधव आदींसह मंडळाचे पदाधिकारी, स्वयंसेवक तथा गावभागातील भक्तगण, परिसरातील नागरिक, अबालवृद्ध, युवक, महिला व पुरुष आरतीच्या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सातव्या वेतनाची अंमलबजावणी करा

## सफाई कामगारांचे माजलगाव नगर परिषदे समोर उपोषण आज पासून सुरू

माजलगाव /प्रतिनिधी

शेख अखिल दि. २२ सप्टेंबर रोजी पासून माजलगाव नगरपरिषदेकडील सफाई कामगारांनी हक्काचे सातव्या वेतन आयोगानुसार वेतन तातडीने अंमलात आणावे या मागण्यांसाठी दिनांक २२ सप्टेंबर सोमवार पासून नगरपरिषद कार्यालया समोर उपोषणास सुरुवात केली आहे. या आंदोलनामुळे नगरपरिषद प्रशासनावर मोठा दबाव निर्माण झाला आहे.

राज्य शासनाने सर्व नगरपरिषद कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा लाभ लागू केला आहे. मात्र माजलगाव नगरपरिषदेकडील काही कर्मचाऱ्यांना आजही तो मिळालेला नाही. याबाबत गेल्या अनेक महिन्यांपासून वारंवार पाठपुरावा करून ही नगरपरिषदेकडून आत्ता पर्यंत कसलाही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे सफाई कामगारांमध्ये प्रचंड नाराजी असून अखेर त्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

याबाबत संघटनेकडून वारंवार मागणी होऊन देखील प्रशासनाने या बॉबीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप सफाई कामगारांनी केला आहे.

या उपोषणामध्ये नगरपरिषद सफाई कामगार संघटनेचे पदाधिकारी तसेच सर्व कामगार महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. सातवा वेतन



आयोग हा आमचा हक्क आहे. तो आम्हाला दिलाच पाहिजे अन्यथा आमचे उपोषण अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा शासनाला सफाई कामगारांनी दिला आहे.

कामगारांच्या मागण्या तातडीने मान्य न झाल्यास हे आंदोलन पुढे उग्र रूप धारण करेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. आहे उपोषणामुळे नगरपरिषद प्रशासनासमोर निर्माण झालेली कोंडी दूर करण्यासाठी आता मुख्याधिकारी काय भूमिका घेतील याकडे सर्वच कामगाराचे लक्ष लागले आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई व कर्जमाफी द्या

## लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलन – डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश : मागील आठवडाभरापासून बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात मुसळधार पाऊस, अतिवृष्टी व ढगफुटी झाली. जिल्ह्यातील तब्बल ७ लाख ८९ हजार ६७६ हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकांची नोंद झाली असून ती सरासरी पेरणीच्या ९७.६ टक्के इतकी आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले आहे.

बीड जिल्ह्यातील २९ महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली असून, त्यापैकी लिंबागणेश महसूल मंडळात सर्वाधिक १०७.३ मि.मी. पाऊस झाला आहे. सततच्या पावसामुळे पिके वाहून गेली, शेतजमिनी तळाला गेल्या, घरांची पडझड झाली, तर कापूस, सोयाबीनसह इतर पिके पाण्यात बुडल्याने शेतकरी पूर्णपणे हतबल झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा, यासाठी आज मंगळवार दि. २३ रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली अहमदपूर – अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी बाळासाहेब मुळे,



कृष्णा पितळे, रमेश गायकवाड आदींची भाषणे झाली.तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना फोनवरून संवाद साधला, मंडळ अधिकारी जायभाये,तलाठी पोतदार,कृषी सहाय्यक आनंद वाघ, नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, बाबासाहेब ढाकणे आदींना निवेदन दिले.यावेळी आंदोलनात राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी,सरपंच बालासाहेब जाधव, दामोदर थोरात, सुरेश निर्मळ,श्रीहरी निर्मळ, ,अँड.गणेश वाणी, बाळासाहेब मुळे, पांडुरंग वाणी, संजय घोलप, शंकर वाणी, श्रीहरी कोटुळे,खंडू वाणी, भगवान मोरे आदी ग्रामस्थ सहभागी होते.

डॉ. ढवळे यांनी स्पष्ट केले की, आता कसला पंचनामा आणि कसली नोंद? शेतकऱ्यांचं सगळंच वाहून गेलं आहे. प्रशासनाने औपचारिकता न करता तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसान भरपाई व कर्जमाफी करावी. अन्यथा शेतकरी आत्महत्यांकडे ढकलले जातील.

## लिंबागणेश – बोरखेड पुल खचला

लिंबागणेश ते बोरखेड मार्गावरील पूल मुसळधार पावसामुळे खचला असून वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. यासंदर्भात आठवडाभरापूर्वी तलाठी, ग्रामविकास अधिकारी आणि बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली होती. मात्र, अद्याप दुरुस्ती न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तातडीने पूल दुरुस्त करून वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



बीड /प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. कष्टाने उभे केलेली पिके पाण्याखाली जाऊन शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. शासन मात्र अजूनही पंचनाम्याच्या नावाखाली वेळकाढूपणा करत असल्याने शेतकरी संतप्त आहेत.

या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते प्रकाश उजगरे यांनी अतिवृष्टीग्रस्त भागांचा पाहणी दौरा करून गावोगावी बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या ऐकल्या. शेतकऱ्यांना धीर देतानाच त्यांच्या न्यायासाठी आघाडी लढा देईल असा निर्धार व्यक्त केला.या संवाद दौऱ्यात असीम शेख, प्रदीप खळगे, सुरज उजगरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. बांधावर मोठ्या संख्येने शेतकरी हजर राहून आपल्या यातना आणि आक्रोश व्यक्त करत होते. प्रकाश उजगरे म्हणाले,शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्या; अन्यथा वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल.




### व्यसनमुक्ती अभियानांतर्गत मेळावा

बीड / प्रतिनिधी : शहरातील व्यसनमुक्ती आधार केंद्रामध्ये भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत जीवन विद्या मिशन आयोजित व्यसनमुक्ती अभियानांतर्गत भव्य मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यांना संस्थेचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युवा पिढी ही राष्ट्राची ऊर्जा आहे समाज आणि देशाच्या विकासासाठी तरुणाईची भूमिका महत्त्वाची असून जास्तीत जास्त तरुणांनी व्यसनमुक्त व्हावे यासाठी व्यसनमुक्ती अभियान राबविण्यात येत आहे. नशा मुक्त भारत अभियाना अंतर्गत समाज कुटुंब मित्र आणि इच्छुक तरुणांनी या मोहिमेत सहभागी होऊन नशा मुक्त राहण्याची प्रतिज्ञा देण्यात आली. यावेळी संस्थेचे तेजस घुमरे, संजय बडगळ सह आदींनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी नागरिक आणि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आमदार सुरेश धस यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

आष्टी (प्रतिनिधी) आष्टी मतदारसंघासह बीड जिल्ह्यात दिनांक १४, १५, १६ सप्टेंबर तसेच काल झालेल्या प्रचंड पावसामुळे आणि पुरपरिस्थितीमुळे शेतजमिनींचे व व्यापाऱ्यांचे अभूतपूर्व नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन तातडीने मदत व पुनर्वसन कायद्यात उपाययोजना करण्यासाठी साकडे घातले आहे. मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, पुरामुळे मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. शासन निर्णयानुसार सध्या मिळणारी ४७ हजार रुपयांची मदत अत्यंत अपुरी असून शेतजमिनी पुन्हा तयार करण्यासाठी हेक्टरी किमान दहा लाख रुपये लागणार आहेत. त्यामुळे केंद्र शासनाच्या मनरेगा योजनेंतर्गत अंतर्गत प्रति हेक्टर पाच लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

या शिवाय नदीपात्र बदलल्याने हजारो शेतकऱ्यांच्या विहिरी बुजल्या असून, २०१४ – १५ मध्ये दिल्या गेलेल्या मदतीच्या धर्तीवर प्रति विहीर तीन लाख रुपयांचे अनुदान द्यावे किंवा नवीन विहिरीस मंजुरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच पुरामुळे वाहून गेलेल्या इलेक्ट्रिक मोटारी, सोलर पंप, ठिबक सिंचन व्यवस्था, कांदा चाळी, पाईपलाईन आदी घटकांना मदत व पुनर्वसन कायद्यात समाविष्ट करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुरामुळे व्यापाऱ्यांचेही कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून, त्यांना देखील आधार देण्यात यावा, अशी मागणी आमदार धस यांनी केली. त्याचबरोबर आष्टी मतदारसंघातील सुमारे ३०० ट्रान्सफॉर्मर्स वाहून गेल्याने विद्युत पुरवठा विस्कळीत झाला असून, हे ट्रान्सफॉर्मर्स तातडीने बसवावेत जेणेकरून आगामी पेरणीसाठी शेतकऱ्यांना पाणीपुरवठा सुरळीत होईल,या बाबीकडेही त्यांनी



मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.केवळ दुष्काळ जाहीर करून उपयोग नाही, तर शेतकऱ्यांना आणि नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा देण्यासाठी तातडीचे व ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे.या सर्व मागण्यांवर मुख्यमंत्री महोदयांनी लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले असल्याची माहिती आमदार सुरेश धस यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना दिली.

# घटस्थापनेने वडवणीच्या रेणुकामातेचा शारदीय नवरात्रोत्सव प्रारंभ

भाविकांच्या रेलचेलने मंदिर परिसर फुलला

वडवणी (प्रतिनिधी) वडवणी परिसराच्या पंचक्रोशीत नवसाला पावणारी माता म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील भाविक-भक्तांची आराध्यदैवता श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी यंदाही मोठ्या जल्लोषात व हर्षोल्हासात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. काल सोमवार रोजी घटस्थापनेने या नवरात्रोत्सवास सुरुवात झाली आहे. सकाळीच रेणुका मातेची विधीवत पूजाअर्चा करुन घटस्थापना करण्यात आली. या मंदिर परिसरामध्ये पहिल्या दिवशीच सकाळीपासून भाविकांची दर्शनासाठी रेलचेल दिसून आली. यावेळी भाविकांच्या उपस्थितीने मंदिर परिसर फुलून गजबजला होता.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी परिसराच्या पंचक्रोशीत नवसाला पावणारी माता म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील भाविक-भक्तांची आराध्यदैवता श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी यंदाही मोठ्या जल्लोषात व हर्षोल्हासात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. यावर्षीचा नवरात्र महोत्सव काल दि.२२ सप्टेंबर २०२५ सोमवार रोजी घटस्थापनेपासून सुरु झालेला आहे. या संपूर्ण नवरात्रीमध्ये श्री.रेणुकामाता संस्थान यांच्याकडून मातेची विधिवत पूजाअर्चा व जागर करण्यात येणार असून दैनंदिन देवीचा जागरही करण्यात येत आहे. दरम्यान वडवणी परिसराच्या पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांच्या श्रध्दास्थान असलेल्या तसेच भाविकांच्या नवसाला पावणारी आई म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्यदैवता शहरातील दक्षिणेस



चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी मातेच्या मनोभावे दर्शनासाठी सध्या नवरात्र महोत्सवादरम्यान भाविक मोठी उपस्थिती दर्शवत आहेत. पहिली माळ सोमवार रोजीपासूनच वडवणी सह परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून रेणुकामातेचे मनोभावे दर्शन घेतले. दररोजच्या सकाळ ७ वाजताच्या व सायंकाळी ७ वाजताच्या मातेच्या आरतीस देखील याठिकाणी भाविकांची उपस्थिती लक्षणीय असते. यावेळी सुंदर अशा मंडपामुळे मंदिर परिसर अधिकच सुंदर दिसत असून या ठिकाणी लावण्यात आलेल्या वेगवेगळ्या रंगाच्या विद्युत रोषणाईने रात्री हा परिसर अधिकच आकर्षक व नयनरम्य दिसून येत आहे. तरी या नवरात्रोत्सवाच्या दरम्यान आयोजित सर्व कार्यक्रमांचा सर्व भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहनही यावेळी श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ, राहूल दुटाळ, बाळासाहेब दुटाळ, परशुराम दुटाळ यांनी केले आहे.



आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील दौलावडगाव, धामणगाव, आष्टी महसुल मंडळात पुन्हा काल रविवारी रात्री अतिवृष्टी वा संततधार पाऊस झाल्याने नद्या नाल्यांना पूर आला. कडा येथील कडी नदीच्या पुलावरुन पुन्हा पाणी वाहिल्याने तीन तास वाहतुक बंद झाली होती. दरम्यान बेलगाव येथील बोकडी नदीला पूर आल्याने बेलगाव परिसरात अतिवृष्टीने पिकांचे अतोनात नुकसान झाले. पुराने जमीनी वाहुन तर गेल्याच ऊस, सोयाबीन, कांदा जमीनदोस्त झाले आहेत. शेतकरी हवालदिल झाला आहे. शासनाने तात्काळ पीक पंचनामे करुन नुकसानबाबत आर्थिक मदत द्यावी अशी मागणी होत आहे.

# सावधान!केज मध्ये फेक फोन पे एस.एम.एस व कॉलद्वारे आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न

केज/प्रतिनिधी

केज शहरातील अशोक विठ्ठल गायकवाड या व्यक्तीला अज्ञात नंबर वरून संशयास्पद कॉल आला.आणि सांगण्यात आले कि,तुमच्या फोन पे वर २५०००/- रुपये पाठवले आहेत कारण माझा फोन पे नंबर ला पैसे जात नाहीत म्हणून तुमच्या नंबर वर टाकलेत आणि अशोक गायकवाड या व्यक्तीला २५०००/- रुपये आपल्या खात्यात जमा झाले आहेत.असा फोन पे वर आणि टेक्स्ट एस.एम.एस.आला. आलेल्या रकमेतून २,०००/-रुपये मला तात्काळ परत फोन पे वर पाठवा, अशी मागणी केली.मात्र, गायकवाड यांनी तात्काळ आपले खाते तपासले असता, कोणतीही रक्कम जमा झालेली नव्हती. एस.एम.एस.पूर्णपणे फेक असल्याचे स्पष्ट झाले.आश्चर्याची गोष्ट मात्र दोन्ही व्यक्ती एकमेकांना ओळखत नव्हते.त्यामुळे फसवणुकीचा हा प्रयत्न अपयशी ठरला.मात्र या प्रकारामुळे नागरिकांना पुन्हा एकदा सावध राहण्याचा ईशारा मिळाला आहे.अज्ञात नंबरवरून आलेले फोन किंवा एस.एम.एस.वर विश्वास ठेवू नये,तसेच कोणत्याही प्रकारचे व्यवहार करण्यापूर्वी स्वतःचे बँक खाते तपासून खात्री करून घ्यावी,असे आवाहन करण्यात येत आहे. खोटे एस.एम.एस. आणि कॉलद्वारे आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार वाढत आहेत. अशा संदेशांवर विश्वास ठेवून पैसे पाठवू नयेत.त्वरित बँक,पोलिसांना माहिती द्यावी अशी माहिती पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी दिली आहे.

